# विद्या प्रसारक मंडळ, ठाणे


| | | |
|---|---|---|
| मासिकाचे नाव | : | दिशा |
| संपादक | : | डॉ. विजय वा. बेडेकर |
| प्रकाशक | : | विद्या प्रसारक मंडळ |
| प्रकाशन वर्ष | : | २००८ |
| वर्ष | : | नववे |
| अंक | : | २ |
| पृष्ठे | : | ४० पृष्ठे |

## गणपत्रिका विद्या प्रसारक मंडळाच्या "ग्रंथालय" प्रकल्पांतर्गत निर्मिती

## गणपत्रिका निर्मिती वर्ष : २०१०

## गणपत्रिका क्रमांक : १२६

MAHMARI 19358/13/1/2000 - TC



विद्या प्रसारक मंडळ
स्थापना • नौपाडा • ठाणे

व्ही. पी. एम्.

# दिशा

वर्ष नववे / अंक २ / फेब्रुवारी २००८

## संपादकीय

## विनाशकारी खरेदी यात्रा


गरज नसतानाही जास्त खरेदी करत राहण्याची माणसातील हाव ही गेल्या तीस चाळीस वर्षांत धोकादायक बाब ठरत चालली आहे. आपल्या उपभोग घेण्याच्या क्षमतेबाहेर माणसे जगभर खरेदी करत सुटलेली आहेत. उपभोगाची एवढी साधने खरेदी करायची की, उपभोग घ्यायलाही वेळ नाही अशी आज स्थिती आहे. अंथरूणे टाकण्यात रात्र सरली आणि झोपताच आले नाही अशी गत असलेला आजचा उपभोक्ता माणूस अंथरूणांचा निरर्थक पसारा पसरत चालला आहे. अनेक कारणे असणारी सुबत्ता व त्यातून निर्माण होणारा, पसरत जाणारा हा ग्राहकवाद (कंझ्युमररिझम) चांगला की वाईट हे ठरवण्यासाठी काळ जाण्याचीही गरज नाही, कारण वाढत्या खरेदीयात्रेतून निर्माण होत चाललेला कचरा, विशेषत: ज्याला इ-वेस्ट किंवा इ-कचरा म्हणतात, त्याचे ढीग माणसाचे अस्तित्व गिळंकृत करत आहेत.

रूटगर्स विद्यापीठ (न्यूजर्सी) येथील उत्क्रांतीय जीवशास्त्राचे प्राध्यापक रॉबर्ट ट्रीव्हर्स यांच्या मते, जास्तीत जास्त हाव असणारी यंत्रे म्हणून आम्ही उत्क्रांत होत चाललो आहोत. हवेपणाची ही हाव (ॲक्विझिटीव्ह इनस्टिंक्ट) इतकी वाढत चालली आहे की, त्यामुळे पर्यावरण पूर्णत: ढासळत चालले आहे. मेंदूत असे काही बदल घडून येत आहेत का की, 'आता पुरे' हे माहीत असतानाही माणसाची वखवख वाढत ठेवत आहेत; याचेही संशोधन चालू आहे.

ध्येय, इच्छा, आकांक्षा आणि स्वप्नपूर्ती या सर्वांचा शिसारी येईल इतक्या गोष्टींचा पसारा जमवण्याचा जो शोध आहे, त्याच्याशी संबंध नाही. खरेदी करणे हा जणू काही जन्मसिद्ध हक्क आहे, अशी माणसांची वागणूक आहे. यातून निर्माण होणारे मॉल संस्कृती सारखे अनेक विषय तर आहेतच, पण एक वेगळे, चुकीच्या दिशेने नेणारे चंगळवादी अर्थशास्त्रही धोकादायक ठरत चालले आहे.

इकॉलॉजिस्ट (संपा पॅट थॉमस) च्या अलीकडील अंकात (अंक ३८, अंक १) जॉन नेइश यांच्या 'बॉर्न टू शॉप?' या लेखात एका सर्वेक्षणाची माहिती आहे. त्यात घन कचऱ्याचे इंग्लंडमधील चित्र सादर केले आहे. इंग्लंडमध्ये प्रतिवर्षी ३० दशलक्ष टन घन कचरा घरगुती उपकरणांतून निर्माण होत आहे. इंग्लंड मध्ये वस्तू खरेदी करण्यासाठी घेतल्या जाणाऱ्या कर्जात कल्पनातील वाढ होत आहे. इंग्लंडच्या लोकसंख्येपेक्षा कितीतरी जास्त क्रेडिट कार्डस तेथील लोक वापरत आहेत. तीनपैकी एका वेळचे जेवणही कचऱ्यात टाकण्यात येत आहे. इंग्लंड सबंधातील ही आकडेवारी प्रतिनिधिक

(पृष्ठ क्रमांक १०वर)



# स्वप्न साकारत आहे...

हे स्वप्न नव्हे एका व्यक्तीचे ! ते आहे समाजातील विचारवंतांचे,
हे स्वप्न नव्हे महंमदी मनोऱ्याचे, ते आहे श्रमिक योजनांचे
हे स्वप्न नव्हे खुशालवंतांचे, नव्हे ते आरामितांचे
नसे ते फावल्या क्षणांचे, गुलजार गादीत विसावतांचे
ते असे अहर्निश श्रमांचे, तसे ते असे श्रमोपासकांचे,
सदा ध्येयध्यासीं मग्न त्यांचे !
हे स्वप्न नव्हे व्यक्तिवैभवाचे, नसे ते आत्मगौरवाचे,
ते असे समाजोन्नतीचे, असे ते युवागौरवाचे
हे स्वप्न न दिसे एका क्षणीं, न एका दिनीं,
न एके यामिनी
दिनरात्र मानसी स्फुरे, सतत निद्रानाशही तें करी !
हे स्वप्न नसे सानुले, नसे ते चौकटी बांधिले
ते असे, भव्यता जयाची महान, सीमा जयाची अस्मान !
हे स्वप्न जसे आमुचे, असावे तसे उपस्थितांचे,
मुदित मनीं सुस्वागत अपुलें करितां
स्वप्न दिसे साकारले
आणि हे स्वप्न कसे आहे ते पहा -
ओसाड भूमी कर्दमीं जिथे घाण
द्वीप साजिरे आज तेथे दृश्यमान
ज्ञानसूर्य येथे उगवला, अज्ञान अंधार लोपला,
दिनरात्र प्रकाश अर्पी, अस्त न जया कल्पिला.
भव्य वास्तू इथे साकारती, दृश्य जयाचें महान,
शिल्पही जयांचे विशेषज्ञान देखिती
मनी जे सुजाण,

दृश्य देखतां जाणवे भव्यता, प्रासाद जणूं सरस्वतीचा,
ज्ञानवीणा जिथे झंकारे सदासर्वदा,
बगीचे जिथे बहरती फुलाफुलांचे रंगरंगती,
उद्यानीं बहरती ताटवे, कारंजी जिथे फवारती.
युवायुवतींचे मग्न घोळके, स्वप्न रंगवितां मग्न जे मानसी
स्वप्न तयांचे आकार घेई, अनुरागप्रारंभ येथेच होई
आचार्य आणि प्राचार्य, सदा इथें रंगती
विज्ञानसत्रीं सदा जयांची वाहिली मती,
कलावंत, सरस्वतीचे तन्मणी, तसे वैज्ञानिक महान्,
इथे जन्मती प्रतिभा जयांची देदीप्यमान
भूदल-सागर-सैनिक, वायुपुत्रही इथे निर्मिती
शक्तियुक्ति जयांची भारतमातेप्रती
नवमानव, नवनागरिक, प्रयत्नीं इथे घडतसे
सत्य, शिव, सुंदर जयांचे अणुरेणीं वसे.
बालके तव शिशुमंदिरी दाखल होतां,
विद्यामंदिरी दौड तयाची न रोखितां
नवयुवक हा प्रवेशितां विद्येचे महाद्वार
स्वप्न आमुचे तयाभोवती होई साकार
नवयुवक हा भारतभूचा सुपुत्र व्हावा,
बुद्धि जयाची, शक्ति जयाची भारतभूचा ठेवा

वा.मा.वैद्यकर

व्ही. पी. एम्.

# दिशा

**वर्ष नववे / अंक २ / फेब्रुवारी २००८**

**संपादक**
डॉ. विजय बेडेकर

**कार्यकारी संपादक**
प्रा. मोहन पाठक

'दिशा' प्रारंभ जुलै १९९६
(वर्ष १२ वे / अंक ८वा)

**कार्यालय**
विद्या प्रसारक मंडळ
डॉ. बेडेकर विद्या मंदिर
नौपाडा, ठाणे - ४०० ६०२
दूरध्वनी : २५४२ ६२७०
www.vpmthane.org

**मुद्रण स्थळ :**
परफेक्ट प्रिंटस्,
नूरीबाबा दर्गा रोड, ठाणे.
दूरध्वनी : २५३४ १२९१
२५४१ ३५४६
Email : perfectprints@gmail.com

## अनुक्रमणिका

| | | | |
|---|---|---|---|
| १) | निखळलेले तारे | प्रा.श्रीनिवास मेघ:श्याम आठल्ये | ३ |
| २) | दिशा : सूची २००७ | श्री. प्र. द. अरदकर | ११ |
| ३) | भारतीय संस्कृती - - बीज, मॉडेल व साधना | श्री. यशवंत साने | १४ |
| ४) | अरुणाचलम येथील रमण महर्षी | श्री. शंकरराव मठ | २६ |
| ५) | वार्धक्य - शाप की वरदान | श्री. प्र. द. अरदकर | ३० |
| ६) | भारतीय तत्त्वज्ञानाची वैशिष्ट्ये | डॉ. मो. दि. पराडकर | ३२ |
| ७) | समर्थ साहित्यसंदर्भातील लक्षणीय पुस्तक | प्रा. मोहन पाठक | ३५ |
| ७) | परिसर वार्ता | संकलित | ३६ |

या अंकात व्यक्त झालेली मते त्या लेखकांची वैयक्तिक मते असून त्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

# आवाहन

विद्या प्रसारक मंडळ, ठाणे ही संस्था ठाण्यात गेली ७५ वर्षांहून अधिक काळ शिक्षणक्षेत्रात कार्य करीत आहे. मराठी व इंग्रजी शाळांबरोबरच कला, वाणिज्य, विज्ञान विधी व्यवस्थापन शाखांची महाविद्यालये, तंत्रनिकेतन व प्रगत अभ्यास केंद्र अशा सर्वांगीण शिक्षणाची सोय संस्थेने केली आहे. पाठ्यपुस्तकीय शिक्षणाबरोबरच विद्यार्थ्यांच्या अंगचे कला, क्रीडा इ. क्षेत्रातील गुण विकसित व्हावेत म्हणून विविध उपक्रम संस्था राबवीत आली आहे. या सर्वांच्या परिणामस्वरूप संस्थेचे विद्यार्थी अभ्यास व अभ्यासेतर परीक्षा व स्पर्धांत उत्तम यश मिळवीत असून संस्थेचे माजी विद्यार्थी समाजात विविध क्षेत्रांत कार्यप्रवण आहेत.

टी.व्ही., व्हिडिओ, सिनेमा व तत्सम नियतकालिके भोगवादी, नीतीहीन संस्कृतीचा प्रसार करण्यात अग्रेसर आहेत. याउलट विधायक, संस्कृतिरक्षक विचार पोचवतील अशी माध्यमे अल्पसंख्य आहेत. संस्कारक्षम विद्यार्थ्यांना, वाचकांना, नागरिकांना वैचारिक खाद्य पुरवावे, त्यांच्यात ईर्षा निर्माण व्हावी व त्यांनी अर्थार्जन व व्यावसायिक यशाबरोबरच सामाजिक कार्य साधावे, या उद्देशाने मंडळाने **'दिशा'** हे नियतकालिक जुलै १९९६ पासून सुरू केले आहे.

**या मासिकाचे वर्गणीदार होऊन किंवा या मासिकात जाहिरात देऊन आपण आमच्या कार्याला हातभार लावावा ही विनंती !** तसेच, आपल्या अमूल्य देणग्या देऊनही आपण दिशासाठी हातभार लावू शकता.

संपर्क
संपादक, दिशा
**विद्या प्रसारक मंडळ, नौपाडा, ठाणे-४०० ६०२**
दूरध्वनी : २५४२ ६२७०

**टीप** : वर्गणी /जाहिरात वा देणगीची रक्कम धनादेशाने पाठवावी. धनादेश (चेक) **''विद्या प्रसारक मंडळ A/c दिशा''** या नावाने पाठवावा.

**वार्षिक वर्गणी रु. २५०/-**

अंकाची किरकोळ
विक्रीची किंमत रु. २५/- फक्त.

वर्गणी पाठविताना आपला पूर्ण पत्ता, पिन कोड व दूरध्वनी कळवावा.

# निखळलेले तारे

*विविध क्षेत्रांतील नामवंतांच्या जाण्याची ही नोंद काही परिपूर्ण नाही, याची जाणीव आम्हांला आहे. पण कृतज्ञता करण्याचा एका ग्रंथपालाचा हा प्रामाणिक प्रयत्न आहे - संपादक*

मानवी जीवन हे विविध गुणांनी संपन्न होत असते. गुणांचा विकास हा विविध क्षेत्रांत होत असतो व त्यायोगे विविध क्षेत्रांतील प्रगती दृग्गोचर होत असते. एकेक गुण हा एकेक आयुष्य पणाला लागल्याने विकसित झालेला असतो. त्यामुळेच एकेका आयुष्याचा अंत झाल्यावर संबंधित क्षेत्रावर कमी जास्त प्रमाणात परिणाम झालेला आढळतो.

इ. स. २००७ या वर्षात विविध क्षेत्रांतील अशा निखळलेल्या ताऱ्यांची नोंद घेण्यात आली आहे. अशा ताऱ्यांचे पुन:स्मरण व्हावे व त्यांच्या कार्याची नोंद घेतली जावी, हा दुहेरी हेतू या संकलनामागे आहे. संकलनासाठी पुढील मुद्दे विचारात घेतले आहेत :-

१) शक्यतो मराठी व्यक्ती, मात्र अपवादात्मक स्थितीत राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावरील इतर व्यक्तींची नोंद केली आहे.

२) अपघात, घातपात, आत्महत्या व हत्या यामुळे मृत्यू पावलेल्यांना वगळले आहे. केवळ आजारपण, वृद्धावस्था व हृद्‌यविकार अशा कारणांनी निधन पावलेल्यांचीच नोंद घेण्यात आली आहे.

३) महाराष्ट्र टाईम्स, लोकसत्ता, सकाळ व लोकमत या दैनिकांमधील माहितीचा वापर केला आहे.

४) सोयीसाठी कलावंत, कायदा, क्रीडा,ज्येष्ठ नागरिक, पत्रकारिता, राजकीय, शिक्षण, संकीर्ण, संगीत व साहित्य असे दहा विभाग पाडले आहेत.

५) अनवधानाने एखादा उल्लेख राहून गेला असल्याची शक्यता गृहीत आहे.

## कलावंत

<u>१) कांबळी मच्छिंद्र (६०) (मृत्यू : ३०/१०/०७) :</u>

मराठी रंगभूमीवरील ज्येष्ठ रंगकर्मी, प्रसिद्ध नाट्यनिर्माते मालवणी भाषिक कलावंत. भद्रकाली प्रॉडक्शन ही स्वत:ची नाट्यनिर्मिती संस्था. वस्त्रहरण, पांडगो इलो रे, चाकरमानी, केला तुका झाला माका ही गाजलेली नाटके. मराठी चित्रपटांतूनही भूमिका. अखिल भारतीय नाट्य परिषदेचे बारा वर्षे अध्यक्ष. विविध पुरस्कारांचे मानकरी. हृद्‌यविकारांच्या तीव्र झटक्याने मुंबई येथे निधन.

<u>२) देशपांडे रमाकांत (७५) (मृत्यू : ३०/०६/०७) :</u>

विद्यार्थीप्रिय प्राध्यापक व हौशी कलावंत. 'वाऱ्यावरची वरात' मधील तपकीर विक्रेता व कामतमामा या गाजलेल्या भूमिका. आम्ही लटिके ना बोलू, सभ्य गृहस्थ हो ही अन्य काही नाटके. वृद्धापकाळाने मुंबई येथे निधन.

<u>३) पवार सुशीलादेवी बापुराव (९२) (जन्म : २२/०५/१५ मृत्यू ३०/०५/०७) :</u>

'वनमाला' या नावाने प्रसिद्ध. राष्ट्रपतिपदक विजेत्या 'श्यामची आई' या चित्रपटातील 'आई' च्या भूमिकेमुळे सर्वत्र प्रसिद्ध. लपंडाव, वसंतसेना, पायाची दासी (हिंदीत चरणों की दासी) हे काही गाजलेले चित्रपट.

संशयकल्लोळ, लग्नाची बेडी अशा नाटकांतून भूमिका. व्ही. शांताराम पुरस्काराने शासनातर्फे गौरव. 'परतीचा प्रवास' हे आत्मचरित्र. वृद्धापकाळाने ग्वाल्हेर येथे निधन.

४) बाकरे सदानंद (८५) (मृत्यू : १९/१२/०७) :

आंतरराष्ट्रीय कीर्तीचे चित्रकार. 'प्रोग्रेसिव्ह ग्रुप' चे संस्थापक. कलेसाठी कला या मताचे पुरस्कर्ते. अनेक होतकरू विद्यार्थ्यांना मार्गदर्शन. विविध पुरस्कारांनी सन्मानित. हृद्यविकाराने दापोली येथे निधन.

५) बोंद्रे विजय (७०) (मृत्यू : २५/०६/०७) :

ज्येष्ठ रंगकर्मी व प्रायोगिक नाट्य कलावंत.' मेन विदाऊट शॅडोज' या त्यांनी दिग्दर्शित केलेल्या नाटकास राज्य नाट्य स्पर्धेत प्रथम पारितोषिक. लंडनच्या 'रॉयल ॲकॅडमी ऑफ ड्रॅमॅटिक आर्टस्' मध्ये काही नाटके सादर. लेखिका शोभा बोंद्रे यांचे पती. अल्पशा आजाराने मुंबई येथे निधन.

६) महाजन के. के. (६४) (मृत्यू : १३/०७/०७) :

प्रसिद्ध सिनेछायाचित्रकार. चार वेळा राष्ट्रीय पुरस्कार प्राप्त. 'फिल्म इन्स्टिट्यूट' मधून सुवर्णपदक. भारतीय माहितीपट निर्माते संघटना, आयफा अकादमी, मामि चित्रपट महोत्सव इत्यादी संस्थांकडून गौरव पुरस्कार. खंडहर, स्वामी, एक दिन प्रतिदिन असे ८० चित्रपट, तसेच बुनियाद सारख्या असंख्य मालिकांचे छायाचित्रण. आजारपणामुळे मुंबई येथे निधन.

७) महामुनी वासुदेव वामनराव (७२) (मृत्यू : ०४/१०/०७) :

हरहुन्नरी कलावंत. उस्मानाबाद जिल्हा परिषदेच्या आरोग्य विभागात 'कला आणि छायाचित्रकार' म्हणून काम विविध नाटकांत भूमिका. हृद्यविकाराने उस्मानाबाद येथे निधन.

८) सिप्पी गोपालदास प्रेमचंद (९२) (जन्म : १४/०९/१४ मृत्यू : २५/१२/०७) :

हिंदी चित्रपटासृष्टीतील ज्येष्ठ निर्माते. फिल्म फेडरेशन ऑफ इंडियाचे माजी अध्यक्ष. इम्पा व अन्य संघटनांचे नेतृत्व. ब्रम्हचारी, सीता और गीता, शान वगैरे गाजलेले चित्रपट. 'शोले' च्या निर्मितीने त्यांचे नाव हिंदी चित्रपटसृष्टीत अमर. दिग्दर्शक रमेश सिप्पी यांचे पिता. अल्पशा आजाराने मुंबई येथे निधन.

**कायदा**

१) पराडकर सूर्यकांत जगन्नाथ (७८) (मृत्यू : ०८/१२/०७) :

मुंबई उच्च न्यायालयातील ज्येष्ठ वकील. भाडे नियंत्रण कायदा, कूळ कायदा, मालकी हक्काची सदनिका कायदा यावर विशेष प्रभुत्व. 'मराठा क्षत्रिय समाजा'चे विश्वस्त. वृद्धपकाळाने मुंबई येथे निधन.

२) राणे दत्तात्रेय (७२) (मृत्यू : २३/०६/०७) :

जेष्ठ विधिज्ञ आणि महाराष्ट्र राज्य एस. टी. महामंडळाचे कायदे विषयक सल्लागार. वृद्धापकाळाने निधन.

**क्रीडा**

१) उगले बाळाराम (५०) (मृत्यू : २४/१०/०७) :

कबड्डीपटू बाळा या नावाने परिचित. सेंट्रल बँक स्पोर्टस् क्लब यांच्या तर्फे खेळाडू. अल्पशा आजाराने मुंबई

येथे निधन.

<u>२) कार्डेज एव्हरेस्टो (४०) (जन्म : ०३/०७/६८ मृत्यू : १३/१२/०७) :</u>

आंतरराष्ट्रीय फुटबॉलपटू. महाराष्ट्र फुटबॉल संघाचा माजी कर्णधार. कर्करोगाने अंबरनाथ येथे निधन.

<u>३) सरदेसाई दिलीप (६६) (मृत्यू : ०२/०७/०७) :</u>

क्रिकट पटू. १९७१ च्या ऐतिहासिक वेस्ट इंडिज व इंग्लंड दौऱ्यावरील विजयाचे शिल्पकार. भारतातर्फे एकूण ३० कसोटींत सहभाग. वृद्धापकाळाने मुंबई येथे निधन.

**ज्येष्ठ नागरिक**

<u>१) करंबळेकर पुरुषोत्तम विठ्ठल (९२) (मृत्यू : २५/१२/०७) :</u>

योग विषयाचे गाढे अभ्यासक. कैवल्यधाम योग संशोधन संस्थेचे निवृत्त संचालक. पातांजल योग सूत्रांवर मराठीसह हिंदी व इंग्रजी भाषेत लिखाण. वृद्धापकाळाने पुणे येथे निधन.

<u>२) जुनैदी बहादूरभाई (१०४) (मृत्यू : ०८/१२/०७) :</u>

नळदुर्ग (ता. तुळजापूर) येथील रहिवासी. पूर्ण नाव अ. रौफ उर्फ बहादूरभाई हाजी अ. रहेमान जुनैदी. वृद्धापकाळाने नळदुर्ग येथे निधन.

<u>३) पतंगराव आनंदीबाई दत्तात्रेय (९५) (मृत्यू : डिसेंबर ०७) :</u>

किन्हवली (ता. शहापूर) येथील रहिवासी. तालुक्यातील पत्रकार व प्रेस क्लबचे उपाध्यक्ष शामराव पतंगराव यांच्या आजी. वृद्धापकाळाने किन्हवली येथे निधन.

<u>४) पनवेलकर सीताबाई रामचंद्र (८४) (मृत्यू : २८/११/०७) :</u>

अंबरनाथ येथील रहिवासी. उद्योजक विश्वनाथ पनवेलकर यांच्या मातोश्री. अल्पशा आजाराने अंबरनाथ येथे निधन.

<u>५) वळवईकर आनंदीबाई दत्ताराम (८४) (मृत्यू : २३/११/०७) :</u>

वसई येथील रहिवासी. दिवंगत ज्येष्ठ रंगकर्मी मा. दत्ताराम यांच्या पत्नी. वृद्धापकाळाने वसई येथे निधन.

<u>६) सकपाळ विठ्ठल लक्ष्मण (१०२) (मृत्यू : ०७/१२/०७) :</u>

ब्रिटिशांच्या काळात टेनिसबॉल बॉय म्हणून काम. नंतर सरकारी नोकरी. चतुर्थ श्रेणी लघुवेतन कर्मचारी संघटनेच्या स्थापनेत सिंहाचा वाटा. दीर्घ आजाराने मुंबई येथे निधन.

**पत्रकारिता**

<u>१) कर्दळे प्रकाश (६६) (मृत्यू : १५/०७/०७) :</u>

इंडियन एक्स्प्रेसच्या पुणे आवृत्तीचे माजी निवासी संपादक व ज्येष्ठ पत्रकार. पुणे श्रमिक पत्रकार संघाचे माजी अध्यक्ष. नागरी प्रश्नांवर सातत्याने लिखाण. लेखिका आशा कर्दळे यांचे पती. हृदयविकाराने पुणे येथे निधन.

<u>२) कोकजे तुकाराम श्रीधर (८०) (मृत्यू : १५/०७/०७) :</u>

ज्येष्ठ पत्रकार. नवशक्ती दैनिकाचे माजी संपादक. त्यातील 'तुकोवाणी' हा वाचकप्रिय स्तंभ. विविध विषयांवर लेखन. निवृत्तीनंतर गोवा येथील दैनिक नवप्रभाचे संपादक. वृद्धपकाळाने मुलुंड येथे निधन.

*चिडणे हा निराशेवर मात करण्याचा मार्ग नाही.*

<u>३) गाडगीळ मिलींद (६५) (मृत्यू : २५/०९/०७) :</u>

जेष्ठ पत्रकार व युद्धनीतीचे अभ्यासक. नवशक्ती व सकाळ या दैनिकांचे सहसंपादक, तर तरुण भारत दैनिकांचे काही काळ संपादक. युद्धशास्त्र व युद्धनीती हे आवडीचे विषय. लेखक व अर्थतज्ज्ञ गंगाधर गाडगीळ यांचे कनिष्ठ बंधू. कर्करोगाने मुंबई येथे निधन.

<u>४) लागू रामचंद्र गोविंद (७५) (मृत्यू : ०३/१२/०७) :</u>

वृत्तपत्र वितरक. ४५ वर्षे व्यवसाय. या क्षेत्रातील अनेक मान्यवर, विशेषत: टाईम्स समूहाशी जवळचे संबंध. वृद्धपकाळाने विलेपार्ले येथे निधन.

<u>५) विचारे महेश (३४) (मृत्यू : ०१/१२/०७) :</u>

सकाळ या दैनिकात वार्ताहर. राजकीय, शैक्षणिक, सामाजिक व विकासात्मक क्षेत्राशी संबंधित पत्रकारिता. पक्षाघाताच्या झटक्याने मुंबई येथे निधन.

**राजकीय**

<u>१) आदिक रामराव (७९) (मृत्यू : ३०/०८/०७) :</u>

महाराष्ट्रचे माजी उपमुख्यमंत्री. ज्येष्ठ विधिज्ञ. काँग्रेसचे माजी प्रांताध्यक्ष. महाराष्ट्राच्या ॲडव्होकेट जनरल पदी नियुक्त होणारे पहिले मराठी वकील. 'बार कौन्सिल ऑफ महाराष्ट्र ॲण्ड गोवा' चे दोन वेळा अध्यक्ष. राजकीय क्षेत्र, वकिली क्षेत्र व सामाजिक क्षेत्राशी संबंध. न्यूमोनियामुळे मुंबई येथे निधन.

<u>२) ओक प्रेमा एल. (८५) (मृत्यू : ३०/०६/०७) :</u>

स्वातंत्र्य सेनानी व कम्युनिस्ट पक्षाच्या सक्रिय सदस्या. बंगाली भाषेवर प्रभुत्व. डॉ. कोटणीस यांच्या २५ व्या पुण्यतिथीनिमित्त चीनमध्ये गेलेल्या शिष्टमंडळात सदस्य म्हणून समावेश. स्त्रिया, विद्यार्थी व फेरीवाले यांच्या प्रश्नांवर लढा. वृद्धापकाळाने मुंबई येथे निधन.

<u>३) कृष्णमूर्ती जना (७९) (मृत्यू : २५/०९/०७) :</u>

भाजपचे ज्येष्ठ नेते. माजी केंद्रीय कायदामंत्री. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे कार्यकर्ते. राज्यसभेचे सदस्य. मूत्रपिंडाच्या आजाराने चेन्नई येथे निधन.

<u>४) गुप्ते मनोहर (७२) (मृत्यू : ०४/०६/०७) :</u>

नाना गुप्ते या नावाने परिचित. ठाण्याचे माजी नगरसेवक. शिवसेनेचे १९६७ ते १९७० या काळातील प्रतोद. हृदयविकाराने ठाणे येथे निधन.

<u>५) चंद्रशेखर (८०) (मृत्यू : ०८/०७/०७) :</u>

माजी पंतप्रधान. समाजवादी जनता पार्टीचे राष्ट्रीय अध्यक्ष. १९६२ पासूनचे संसद सदस्य. तत्त्वचिंतक राजकारणी. उदारीकरणाचे विरोधक. कर्करोगाने नवी दिल्ली येथे निधन.

<u>६) जोशी नंदकिशोर (५०) (मृत्यू : १६/१२/०७) :</u>

भाजपचे अभ्यासू नगरसेवक. व्यवसायाने वकील. संत गाडगेबाबा ट्रस्ट, स्वामी विवेकानंद सहकारी पतपेढी इ. संस्थांच्या स्थापनेत सहभाग. हृदयविकाराने डोंबिवली येथे निधन.

<u>७) देसाई नारायण आत्माराम (८६) (मृत्यू : ०५/०८/०७) :</u>

जेष्ठ मार्क्सवादी विचारवंत व डांगेवादी विचारांचे खंदे समर्थक. गोवा मुक्ती आंदोलनात सहभाग. शास्त्रीय तत्त्वज्ञान, बुध्द माझा सांगाती, २१ वे शतक आणि विवेकानंद इत्यादी ग्रंथांचे लेखक. कर्करोगाने मुंबई येथे निधन.

<u>८) नवलकर प्रमोद सच्चिदानंद (७२) (जन्म : २३/०१/३५ मृत्यू : २०/११/०७) :</u>

शिवसेनेचे ज्येष्ठ नेते, पत्रकार, आमदार, माजी मंत्री, दैनिक नवशक्तीतील भटक्याची भ्रमंती हे लोकप्रिय सदर. उमाळा, बेधडक, भटक्या, निवडक नवलकर, झेप इत्यादी ग्रंथांचे लेखक. हृद्यविकाराने मुंबई येथे निधन.

<u>९) मोरे प्रभाकर (८४) (मृत्यू : ३०/१२/०७) :</u>

गिरणी कामगार नेते. समाजवादी चळवळीतील अग्रणी. वृद्धपकाळाने मुंबई येथे निधन.

**शिक्षण**

<u>१) भट महेंद्र (७६) (मृत्यू : ३०/०९/०७) :</u>

भौतिकशास्त्राचे अध्यापक. गुजराती भाषिक असूनही मराठीचे अफाट वाचन. वाङ्मय, संगीत, संस्कृती यांचे अभ्यासक. त्यांचे घर म्हणजे जणू गुरुकुल आणि संदर्भालयच. अखेरपर्यंत अविवाहित. हृदयविकाराच्या तीव्र धक्क्याने मुंबई येथे निधन.

<u>२) वालावलकर आत्माराम (७४) (मृत्यू: ०७/१०/०७) :</u>

हिंदीचे शिक्षक. राज्य सरकारच्या सेवेत उपजिल्हाधिकारी. प्राध्यापक विद्याधर वालावलकर यांचे वडील. दीर्घ आजाराने ठाणे येथे निधन.

**संकीर्ण**

<u>१) कानडे रमेशचंद्र (५६) (मृत्यू : २८/०६/०७) :</u>

आदिवासी विभागाचे प्रधान सचिव. हार्मनी मासिकाचे संपादक. सामान्य प्रशासन, रोजगार हमी योजना, मुख्य राजशिष्टाचार अधिकारी अशा विविध पदांवर काम. कर्करोगाने मुंबई येथे निधन.

<u>२) किर्लोस्कर शांताबाई मुकुंदराव (८४) (मृत्यू : १६/१२/०७) :</u>

ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्त्या. किस्त्रीमच्या संपादक मंडळातील एक. विविध संस्थांच्या स्थापनेत सहभाग. डाक्याची साडी, शोध, देणगी, भुईचक्र इत्यादी अनेक पुस्तकांचे लेखन. फ्रान्समधील स्त्री चळवळीच्या उद्गात्या सिमोन दि बोआ यांच्या दि सेकंड सेक्स याचे बायकांचा जन्म या नावाने भाषांतर. अनेक गौरव पुरस्कारांनी सन्मानित. दीर्घ आजाराने पुणे येथे निधन.

<u>३) गांधी रामचंद्र (७०) (मृत्यू : १३/०६/०७) :</u>

माजी प्राध्यापक. एलटि क्लबचे माजी सदस्य. महात्मा गांधी यांचे नातू. वृद्धापकाळाने नवी दिल्ली येथे निधन.

<u>४) देशपांडे सुधाकर (८०) (मृत्यू : २४/१२/०७) :</u>

माजी उपप्राचार्य. आचार्य अत्रे यांचे जावई. लेखिका मीना देशपांडे यांचे पती. प्रदीर्घ आजाराने मुंबई येथे निधन.

५) नेरलीकर माधवराव (८४) (जन्म : २३/०४/२४ मृत्यू : ०२/१२/०७) :

माजी मुख्याध्यापक. दलित चळवळीतील सक्रीय कार्यकर्ते. माजी आमदार. वृद्धापकाळाने पूर्णा येथे निधन.

६) प्रधान मालती (८०) (मृत्यू : २७/०९/०७) :

अकरावीला बोर्डात पहिली येण्याचा मान. डोंबिवलीतील पहिल्या महिला डॉक्टर. डोंबिवली भूषण पुरस्काराने सन्मानित. वृद्धापकाळामुळे डोंबिवली येथे निधन.

७) पाटील रा. कृ. (९९) (जन्म : १३/१२/१९०७ मृत्यू : ०१/०६/२००७) :

गांधीवादी देशभक्त. लंडनमधून भारतीय प्रशासकीय सेवा परीक्षा उत्तीर्ण. स्वातंत्र्योत्तर काळात विविध मंत्रिपदे भूषविली. मरणोत्तर महाराष्ट्र भूषण पुरस्कार प्रदान. वृद्धापकाळामुळे नागपूर येथे निधन.

८) पॉल निब्बर (९२) (मृत्यू : ०१/११/०७) :

अमेरिकन बॉम्बर विमानाचा पायलट. याच्याच विमानातून हिरोशिमा शहरावर अणुबॉम्ब टाकण्यात आला. पुढे आयुष्यभर लोकांच्या दूषणांना तोंड द्यावे लागले. दुर्धर आजाराने अमेरिकेतील ओहायो येथे निधन.

९) बच्चन तेजी हरिवंशराय (९२) (जन्म: १२/०९/१९१५ मृत्यू : २३/१२/२००७) :

जुन्या जमान्यातील अभिनेत्री. कवी हरिवंशराय यांची द्वितीय पत्नी. अभिनेते अभिताम यांची आई. वृद्धापकाळामुळे मुंबई येथे निधन.

१०) महाजन विष्णु पांडुरंग (८०) (मृत्यू : २६/११/०७) :

सामाजिक कार्यकर्ते. विविध शैक्षणिक व सामाजिक संस्थांशी जवळचा संबंध. १९६० च्या दशकात डोंबिवली नगरपालिकेवर निवड. वृद्धापकाळामुळे पुणे येथे निधन.

११) संगवई संजय (४६) (मृत्यू : २९/०५/०७) :

नर्मदा बचाओ आंदोलनातील कार्यकर्ते व पत्रकार. पर्यावरण, मानवी हक्क, सामाजिक प्रश्न यावर सातत्याने लेखन. हृदयविकाराने केरळमधील कोची येथे निधन.

१२) सावंत सीताराम सखाराम (८५) (मृत्यू : ०४/०९/०७) :

संयुक्त महाराष्ट्र चळवळीतील ज्येष्ठ कार्यकर्ते. शेकापचे माजी आमदार. शिवाजी मंदिर ट्रस्टचे अध्यक्ष. गिरणी कामगारांच्या मुलांना शैक्षणिक मदत पुरविण्यात पुढाकार. वृद्धापकाळामुळे सिंधुदुर्गमधील ओरोस येथे निधन.

## संगीत

१) डावजेकर दत्तात्रेय शंकर (९०) (जन्म : १५/११/१९१७ मृत्यू : १९/०९/२००७) :

संगीतकार. सरकारी पाहुणे, म्युनिसिपालिटी, रंगल्या रात्री अशा इत्यादी अनेक चित्रपटांना संगीत. सैनिक हो तुमच्यासाठी यासारखी चित्रपटेतर गीतांचेही संगीत गाजले. अनेक पुरस्कारांनी सन्मानित. डीडी या नावाने परिचित. प्रदिर्घ आजाराने मुंबई येथे निधन.

२) नाईक दत्ताराम (७८) (मृत्यू : ०८/०६/०७) :

एन्. दत्ताराम या नावाने परिचित. दत्ताराम ठेका या तालाचे जनक. सुप्रसिद्ध संगीतकार. अब दिल्ली दूर नही, परवरिश, श्रीमान सत्यवादी हे काही गाजलेले चित्रपट. हृदयविकाराने गोव्यातील मावळिंगे येथे निधन.

३) भाटकर वासुदेव (८८) (मृत्यू : २९/०५/०७) :

स्नेहल भाटकर, बी. वासुदेव व सुधीर फडकेंबरोबर वासुदेव-सुधीर या नावांनी संगीत दिले. मुबारक बेगमकडून गाऊन घेतलेले 'कभी तन्हाईयों में हमारी याद आएगी' हे गीत विलक्षण लोकप्रिय. अनेक पुरस्कारांनी सन्मानित. अभिनेते रमेश भाटकर यांचे वडील. हृदयविकाराच्या तीव्र धक्क्याने मुंबई येथे निधन.

## साहित्य

१) कुलकर्णी अंजनकुमार श्रीनिवास (६०) (जन्म : १९/१०/१९४७ मृत्यू : ०९/१२/२००७) :

ज्येष्ठ साहित्यिक व सांगली आकाशवाणी केंद्रातील माजी ग्रंथपाल. आमेन / शायरा, आशियाना इत्यादी ग्रंथ प्रकाशित. अल्पशा आजाराने मिरज येथे निधन.

२) ओक पुरुषोत्तम नागेश (मृत्यू : ०४/१२/०७) :

ज्येष्ठ साहित्यिक,इतिहासतज्ज्ञ व स्वातंत्र्यसेनानी. नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्या 'इंडियन नॅशनल आर्मी' तील सैनिक. ताजमहाल की तेजोमहालय यासह अनेक गाजलेल्या पुस्तकांचे लेखक. वृद्धापकाळामुळे पुणे येथे निधन.

३) धोंड मधुकर वा. (९३) (मृत्यू : ०५/१२/०७) :

नव्या-जुन्या वाङ्मयाचे व्यासंगी. ज्येष्ठ समीक्षक व लेखक. मऱ्हाटी लावणी, ज्ञानेश्वरीतील लौकिक सृष्टी, तरीही येतो वास फुलांना, जाळ्यातील चंद्र इत्यादी विवेचक ग्रंथ. अनेक गौरव पुरस्कारांनी सन्मानित. वृद्धापकाळामुळे मुंबई येथे निधन.

४) भागवत श्रीकृष्ण पुरुषोत्तम (८४) (जन्म : २७/१२/१९२३ मृत्यू : २१/०८/२००७) :

समीक्षक व संपादक. सत्यकथा व मौज या नियतकालिकांचे संपादन. मौज प्रकाशन गृहाचे संवर्धक. 'चतुरंग'च्या जीवनगौरव पुरस्कारासह अनेक सन्मान प्राप्त. हृदयविकाराने शिव येथे निधन.

५) मेश्राम केशव (७०) (मृत्यू : २९/११/०७) :

प्राध्यापक, कवी व लेखक. उत्खनन, अकस्मात, कृतकपुत्र इत्यादी काव्यसंग्रह; कोळिष्टके, पत्रावळ इत्यादी कथासंग्रह; आंबेडकर एक चिंतन, धर्मांतराचे अर्धशतक इत्यादी समीक्षाग्रंथ असे विपुल लेखन. महाराष्ट्र फाऊंडेशनचा समाजकार्य गौरव पुरस्कारासह अनेक मानसन्मान. साहित्यसंमेलनाचे अध्यक्ष. फुफ्फुसाच्या कर्करोगाने मुंबई येथे निधन.

६) मेश्राम भुजंग (५०) (मृत्यू : २७/०८/०७) :

कवी व लेखक. गोंडी, परधानी, बंजारी या बोली भाषांबरोबरच मराठीतही लेखन. मोहोळ या आदिवासी काव्यसंग्रहाचे संपादन. आदिवासी साहित्य संमेलनाचे अध्यक्षपद भूषविण्याचा मान. हृदयविकाराने अंबरनाथ येथे निधन.

७) लिमये वृंदा (७७) (मृत्यू : २५/०७/०७) :

जेष्ठ कवयित्री. काळोख, कमळ, नि:शब्दांचे रंग इत्यादी काव्यसंग्रह; अक्षरविश्व हा समीक्षाग्रंथ. उत्तम गायिका. प्रदीर्घ आजाराने विलेपार्ले येथे निधन.

<u>८) वैद्य सरोजिनी शंकर (७४) (जन्म : १५/०६/१९३३ मृत्यू : ०३/०८/२००७) :</u>

ज्येष्ठ लेखिका आणि समीक्षक. मुंबई विद्यापीठाच्या माजी मराठी विभाग प्रमुख. राज्य मराठी विकास संस्थेच्या पहिल्या संचालक. नाट्यछटाकार दिवाकर यांच्या साहित्यावर डॉक्टरेट. ज्ञानदेवी या संत एकनाथ पूर्व ज्ञानेश्वरीच्या प्रतीचे संपादन. कवी शंकर वैद्य यांच्या पत्नी. कर्करोगाने पुणे येथे निधन.

<u>९) हैदर कुर्रतुल - ऐन (८०) (मृत्यू : २१/०८/०७) :</u>

ज्ञानपीठ व साहित्य अकादमी पुरस्कार विजेत्या उर्दू लेखिका. भारताच्या फाळणीवर आधारित 'आग का दरिया' ही विशेष गाजलेली कांदबरी. 'आखिरे शाब के हमसफर' या कादंबरीसाठी १९८९ मध्ये ज्ञानपीठ पुरस्कार प्राप्त. भारत सरकारतर्फे पद्मश्री. वृद्धापकाळामुळे नवी दिल्ली येथे निधन.

सुमारे ६० व्यक्तींच्या नोंदी या संकलनात आहेत. २००८ सलातील अशा नोंदी श्री. आठल्ये यांच्याकडे पुढील पत्त्यावर पाठवल्यास, ते त्या पुढील वर्षाच्या संकलनात घेऊ शकतील.

संकलक :
**प्रा. श्रीनिवास मेघ:श्याम आठल्ये**
ग्रंथपाल,
स्वामी विवेकानंद रात्र महाविद्यालय,
डोंबिवली (पूर्व) ४२१ २०१

मुखपृष्ठावरून
**संपादकीय**
**विनाशकारी खरेदी यात्रा**

म्हणावी लागेल. ज्युलिएट स्कॉट यांचे 'द ओव्हर स्पेंट अमेरिकन: व्हाय वी वॉंट, वॉट की डोन्ट नीड' या पुस्तकात (१९९९) अमेरिकेचे चित्रही असेच आहे.

यावर उपाय म्हणजे खरेदीची गरज नाही, ही भावना निर्माण व्हायला हवी आहे. उपभोक्तावादावरील (कंझ्युमरिझम) अनेक पुस्तकांत हाच सूर आहे. आत्मसामाधानाचा मार्गच हे लेखक सुचवत आहेत. गरज नसेल तरी का खरेदी करायची, 'गरज' म्हणजे नेमके काय आहे व आपल्या संदर्भातील गरजांचा नेमका अर्थ काय असतो याचा माणसाने विचार करायला हवा आहे. म्हणजेच, स्वत:ला तपास राहायला हवे आहे.

केवळ इलेक्ट्रॉनिक साधनांचा वापर केला, त्यांची सुबत्ता असली, त्या तळागाळापर्यंत पोहोचल्या म्हणजे प्रगती होते का? प्रगतीला इतर कितीतरी वेगळे संदर्भ आहेत. दुसऱ्याशी तुलना करत राहायचे, स्पर्धा करत राहायचे हेही चुकीचेच ठरत आहे. काळाबरोबर जाणे म्हणजे वस्तू कचऱ्यात टाकत राहाणे असा अर्थ आज बनू पाहात आहे. 'युज ॲड थ्रो' (वापरा आणि फेका) दृष्टिकोन घातक ठरत आहे. अशा वेळी जुन्या विचारांतील मथितार्थ लक्षात घ्यावे लागतील. नवे ते हवे ही हाव आपले अस्तित्व संपवण्यापूर्वी हे व्हायला हवे!

•••

# दिशा : सूची २००७

*दिशामध्ये २००७ सालात प्रकाशित झालेल्या लेखांची अकारविल्हे सूची आमचे वाचक श्री. सचिन गराटे (ग्रंथालय विभाग, रूपारेल महाविद्यालय) यांनी संकलित करून पाठवली आहे. वाचकांच्या संदर्भासाठी ती देत आहोत.*



| | लेख | लेखक | पृ. | महिना |
|---|---|---|---|---|
| १ | अमेरिकेतील निसर्गाचा रंगोत्सव | नाडकर्णी, नरेंद्र | १५ | डिसें. |
| २ | असे साजरे केले अमृतमहोत्सवी वर्ष | फिरके, ललित<br>मोहिते, कांचन व<br>धर्माधिकारी, रश्मी | २८ | एप्रिल |
| ३ | अरुणाचलम् येथील रमण महर्षी १ | मठ, शं. बा. | ३ | नोव्हें. |
| ४ | अरुणाचलम् येथील रमण महर्षी २ | मठ, शं. बा. | ३ | डिसें. |
| ५ | आधुनिक ग्रंथालयात मी घालवलेले दोन तास | पारनाईक, श्री. गो.र | २९ | फेब्रु. |
| ६ | आमची चीन यात्रा १ | भोळे, अपर्णा | ३० | ऑग. |
| ७ | आमची चीन यात्रा २ | भोळे, अपर्णा | २१ | सप्टें. |
| ८ | आमची चीन यात्रा ३ | भोळे, अपर्णा | २५ | ऑक्टो. |
| ९ | एक उपयुक्त पुस्तिका | पाठक, मोहन | १० | नोव्हें. |
| १० | ओळख काही प्रतीकांची | आठल्ये, श्रीनिवास | १४ | ऑग. |
| ११ | कलाध्यापकहो उत्तिष्ठ, जागृत-- | दांडेकर, मंजिरी | १७ | फेब्रु. |
| १२ | कहाणी कोयनेची (पुस्तक परिचय) | देशमुख, मानसी | २७ | जाने. |
| १३ | कागदविरहित ग्रंथालये | अहिरराव, योगानंद | १७ | जून |
| १४ | काळनिश्चयनासाठी उपयुक्त ठरणारा महत्त्वाचा संदर्भ ग्रंथ (पुस्तक परिचय) | पाठक, मोहन | २१ | फेब्रु. |
| १५ | किशोरांची नवनिर्मिती स्पर्धा: चीनचा सफल उपक्रम | आगरकर, सुधाकर | २६ | ऑग. |
| १६ | कुनमिंग: चीनच्या प्रगतीची साक्ष देणारे शहर | आगरकर, सुधाकर | ३ | सप्टें. |
| १७ | कृष्ण भक्ती | देवधर, मालती | २८ | ऑक्टो. |
| १८ | खरंच गरज आहे मराठीला रोमँटिक करण्याची | भिडे, आशा | ३० | जुलै |
| १९ | गीताई : विनोबा | भिडे, आशा | २४ | जाने. |
| २० | गीताई | भिडे, आशा | १९ | फेब्रु. |
| २१ | गीताई | भिडे, आशा | १९ | मार्च |
| २२ | गीताविश्व | भिडे, आशा | २० | एप्रिल |
| २३ | गीताविश्व | भिडे, आशा | ३३ | मे |
| २४ | ग्रंथालय संगणकीकरण आणि आधुनिकीकरण (पुस्तक परिचय) | आठल्ये, श्रीनिवास | २७ | एप्रिल |
| २५ | ग्रंथालयाकडून साधना अपेक्षा | कुसेकर, चंदाराणी | १७ | नोव्हें. |
| २६ | घर एक उद्योग (मंदिर) | कर्वे, प्रभा | २५ | जुलै |
| २७ | ताजमहलाचे सत्य स्वरूप | गोडबोले, वा. शं. | ८ | सप्टें. |
| २८ | थोर संत मामा साहेब देशपांडे आणि श्री ज्ञानेश्वर (मुलाखत मोहन पाठक) | कर्णिक, प्रदीप | १२ | सप्टे. |
| २९ | दहशतवादाची दहशत | करमळकर, संहिता | २७ | जुलै |
| ३० | दिशा : एप्रिल ७ - एक अभिप्राय | लागू, सुरेन्द्र | ३३ | जुलै |



*पापी माणसे तोंडाने बळकट पण अंत:करणाने दुबळी असतात.*

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ३१ | देहेत्यागिता | देवधर, मालती | १६ | जाने. |
| ३२ | नामस्मरण : नामश्रेष्ठ की स्मरण | भिडे, आशा | १२ | जून |
| ३३ | निमित्त मंगळागौरीचे | सिंग, शकुंतला | ९ | नोव्हे. |
| ३४ | निसर्गरम्य  केळवे | ठाकूर, अशोक | १२ | नोव्हे. |
| ३५ | परिसर वार्ता: यासाठी तक्ता २ पहावा. परिसरातील वृक्ष : बहावा | कोलेट, मोझेस | २५ | जाने. |
| ३६ | पहिल्या स्वातंत्र्य संग्रामाचा इतिहास | गाणार, शशिकांत | २३ | डिसे. |
| ३७ | पुण्यस्मरण | गायतोंडे, अविनाश | २९ | जाने. |
| ३८ | प्रश्नांचे बाण | पाठक, मोहन | ३० | नोव्हे. |
| ३९ | पॉंडिचेरीचा श्री अरबिंदो आश्रम | नाडकर्णी,नरेंद्र | २३ | मे |
| ४० | बचत: एक महत्त्वपूर्ण संसार | पाठक, मोहन | २३ | एप्रिल |
| ४१ | ब्रह्मचर्य: एक वरेण्यतत्त्व | नाडकर्णी,नरेंद्र | ३२ | जून |
| ४२ | ब्रह्मांड व परिवार | मठ, शं.बा. | २९ | सप्टे. |
| ४३ | भारतीय उत्सव | पाठक, मोहन | १८ | जाने. |
| ४४ | भारतीय संस्कृती-बीज, मॉडेल व साधना | साने, यशवंत | ८ | जाने. |
| ४५ | भारतीय संस्कृती-बीज, मॉडेल व साधना | साने यशवंत | १० | मार्च |
| ४६ | भारतीय संस्कृती-बीज, मॉडेल व साधना | साने यशवंत | १० | एप्रिल |
| ४७ | भारतीय संस्कृती-बीज, मॉडेल व साधना | साने यशवंत | २१ | मे |
| ४८ | भारतीय संस्कृती-बीज, मॉडेल व साधना | साने, यशवंत | १० | जून |
| ४९ | भारतीय संस्कृती-बीज, मॉडेल व साधना | साने, यशवंत | १७ | जुलै |
| ५० | भारतीय संस्कृती-बीज, मॉडेल व साधना | साने, यशवंत | २५ | ऑग. |
| ५१ | भारतीय संस्कृती-बीज, मॉडेल व साधना | साने, यशवंत | ५ | सप्टें. |
| ५२ | भारतीय संस्कृती-बीज, मॉडेल व साधना | साने, यशवंत | २७ | ऑक्टो. |
| ५३ | भारतीय संस्कृती-बीज, मॉडेल व साधना | साने, यशवंत | ७ | नोव्हे. |
| ५४ | भारतीय संस्कृती-बीज, मॉडेल व साधना | साने, यशवंत | २३ | डिसे. |
| ५५ | मनातील हाव | पाठक, मोहन | २३ | फेब्रु. |
| ५६ | महायोगी अरविंदांचा स्वातंत्र्य लढ्यातील सहभाग १ | नाडकर्णी, नरेंद्र | ३ | जुलै |
| ५७ | महायोगी अरविंदांचा स्वातंत्र्य लढ्यातील सहभाग २ | नाडकर्णी, नरेंद्र | ३ | ऑग. |
| ५८ | माणूस : काही क्षण विचारांचे | पाठक,  मोहन | ३६ | मे |
| ५९ | मुंबईच्या महासागरात आईचे हरवणे | पांडे, भा.सा. | ३ | जून |
| ६० | माझा शैक्षणिक प्रवास व ग्रंथालये | बढे, योगंधरा | २२ | जाने. |
| ६१ | या चित्रामागे दडले काय ? | दांडेकर, मंजिरी | १५ | जाने. |
| ६२ | याला जीवन ऐसे नाव | मेहंदळे, पद्मा | १४ | फेब्रु. |
| ६३ | योगी श्री अरविंद ३ | मठ, शं.बा. | ३ | जाने. |
| ६४ | योगी श्री अरविंद | मठ, शं.बा. | ३ | फेब्रु. |
| ६५ | युगकर्ती डॉ. मॉंटेसरी | देशपांडे, विशाखा | ७ | मार्च |
| ६६ | रवींद्रमनन : एक अंतर्मुख अनुभव | पाठक, मोहन | ३९ | मार्च |
| ६७ | राजेंद्र प्रसाद (डॉ.) | शिंगाडे, चंद्रकांत | २३ | डिसें. |
| ६८ | रामायण: एक चिरंतन संस्कारप्रतीक | नाडकर्णी, नरेंद्र | १७ | एप्रिल |
| ६९ | डॉ. विजय बेडेकर : कार्याध्यक्ष, ६० पूर्ण | करंदीकर, श्री. वि. | ३ | ऑक्टो. |

*आपत्ती नेहमी हानी करण्यासाठीच येते असे नाही.*

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ७० | विदरचना | आचार्य, गोएंका | २६ | फेब्रु. |
| ७१ | (विस्डम) च्या वाट | साने, यशंवत | ७ | फेब्रु. |
| ७२ | शालेयशिक्षण : व्याख्यांच्या संदर्भात | पाठक, मोहन | २९ | मार्च |
| ७३ | शिक्षण एक चिंतन | गुरव, दत्तात्रय | २४ | मार्च |
| ७४ | श्रावण स्मृती : मातृदिन | शेवडे, मैथिली | ७ | नोव्हे. |
| ७५ | श्री अरविंदांचे उत्क्रांति विषयक विवेचन : १ | मठ, शं.बा. | ३ | एप्रिल |
| ७६ | श्री अरविंदांचे उत्क्रांति विषयक विवेचन : २ | मठ, शं.बा. | ३ | मे |
| ७७ | श्री अरविंदांने उराशी बाळगलेली स्वप्ने | मठ, शं.बा. | ३ | मार्च |
| ७८ | श्री मच्छिंद्रनाथ | देवधर, मालती | २३ | जुलै |
| ७९ | संत पुरंदरदास: एक महान भगवान भक्त | कळमकर, उषा | १९ | डिसे. |
| ८० | संदर्भ ग्रंथसूचीचे महत्त्व संपादकीय-यासाठी तक्ता १ पहावा | आठल्ये, श्रीनिवास | २९ | मे |
| ८१ | साहित्य शोध : संशोधनातील महत्त्वाचा घटक | आठल्ये, श्रीनिवास | २० | नोव्हे. |
| ८२ | सूर्योपासना | मठ, शं. बा. | १० | ऑग. |
| ८३ | सूर्योपासना | मठ, शं. बा. | १५ | ऑक्टो. |
| ८४ | सूर्य देवता विषयक माहिती १ | मठ, शं. बा. | ७ | जून |
| ८५ | सूर्य देवता विषयक माहिती २ | मठ, शं. बा. | १८ | जुलै |
| ८६ | सूर्यमंदिरे | मठ, शं. बा. | १५ | ऑक्टो. |
| ८७ | स्टोन फॉरेस्ट | आगकर, सुधाकर | १० | ऑक्टो. |
| ८८ | होय, मी वाचन करतो | म्हात्रे,एस. एन्. | २१ | मार्च |
| ८९ | होळकर शाहीच्या इतिहासाची साधने | गणपुले, सुनीता | १९ | ऑक्टो. |
| ९० | ज्ञानपीठ पुरस्कार : एक विचार | भिडे, आशा | १५ | नोव्हे. |
| ९१ | २१ व्या शतकातील भावी शिक्षक | कुलकर्णी, हेरंब<br>किन्हाळकर, वृषाली | २९ | डिसे. |

**तक्ता - १ (अकारविल्हे)**

| संपादकीय २००७ | |
|---|---|
| अर्थसंकल्प | फेब्रुवारी |
| आता काय परिस्थिती आहे | नोव्हेंबर |
| ऊर्जा | सप्टेंबर |
| चष्मे बदलावे लागतील | एप्रिल |
| न कळे यातुनि काय साधिसी | डिसेंबर |
| प्रदूषित वाहतूक व्यवस्था | ऑक्टोबर |
| प्रवेश | जून |
| प्राथमिक शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण | मे |
| शिक्षण चिंता आणि चिंतन | मार्च |
| शैक्षणिक अनुभव देणारी चीन भेट | ऑगस्ट |
| स्वातंत्र्याची साठीशांत करणाऱ्या देशाची नियती | जुलै |
| २००६-२००८ | जानेवारी |

**तक्ता - २**

| परिसर वार्ता : | पृ.क्र. |
|---|---|
| जाने | ३१ |
| फेब्रु | ३३ |
| मार्च | ३३ |
| एप्रिल | ३३ |
| मे | ३८ |
| जून | ३७ |
| जुलै | ३५ |
| ऑगस्ट | ३४ |
| सप्टेंबर | ३३ |
| ऑक्टोबर | २९ |
| नोव्हेंबर | ३२ |
| डिसेंबर | ३४ |


# भारतीय संस्कृती- बीज, मॉडेल व साधना

*शुन:शेप आख्यानाचा संदर्भ घेऊन केलेले विवेचन हा लेखमालेतील पुढील लेख आहे. - संपादक*

**प्रास्ताविक :**


दिशाच्या जानेवारी २००८ च्या अंकात ऋग्वेदांतील एका विषयाची, माझ्या मताने अत्यंत, **अर्थगर्भ असे ''शुन:शेप''** आख्याना बद्दल, प्राथमिक चर्चा केली. त्यांतील 'शुन:शेप ऋषी' (शुन याचा अर्थ कुत्रा नव्हे तर 'मुमुक्षु') ह्यांचे स्वत:च्या आत्म्याचे **'वरुण पाश'** कसे सैल करावयाचे व त्यापासून मुक्ती मिळवावयाची, ह्याची 'कथा' सांगण्याचा प्रयत्न केला.

ह्या लेखात, हा धागा पकडून 'भारतीय संस्कृतीत' मानवी जीवनातील 'वैश्विक कोड्याचा' व 'आत्मिक उन्नतीचा प्रश्न' कसा बघितला जातो आहे, हे मांडणार आहे. तसेंच, ह्या प्रयत्नामध्ये यज्ञ, उध्वरेत क्रिया, कुंडलिनी जागरण, प्रवर्ग्य, त्रेताग्नि यज्ञ, सोमरसाची प्राप्ति व विनीयोग. 'वरूण पाश' कोणते व कां ? ह्या संकल्पनांची ओळख व परस्पर संबंध सांगण्याचा प्रयत्न पुढील लेखमालेत करणार आहे.



Picture No 001 Shunah Shape Rigveda Aakhyana

Earth as a Field of Growth of Consciousness by Law of Dialectics (Dwait vad) in Universe as School Supporting System



Picture No 2

**''अलौकिक यज्ञकृति''**

ह्या विषयांबद्दलची माहिती विस्कळीत व गूढभाषेत व 'प्रतीक भाषा' व 'छाया भाषा', ह्यामध्ये विखूरलेली सांपडेल. चार वेद, पुराणे, ब्राह्मणे, मनुस्मृती, उपनिषदे व आख्याने ह्यामध्ये निरनिराळ्या विषयांवर ज्ञान देतांना ह्या शुन:शेपच्या कोड्याचेही संदर्भ सांपडतात, पण विखुरलेले !!

तरी पण, त्यांचा एकत्रित विचार केल्यावर एका विलक्षण 'अलौकिक वैश्विक यज्ञ कृतीची यंत्रणा' दिसूं लागते. ह्या एकसूत्री यंत्रणेचा व त्या यंत्रणेच्या उच्च हेतूंचा

तरच, एका अत्यंत प्रगल्भ वैश्विक योजनेचे स्वरूप व ज्ञान, 'साक्षात्कारी पद्धतीने' (Intutive Method) होऊं लागते. तिचा थोडा प्रत्यय देण्याचा मी या लेखात प्रयत्न करणार आहे !!

**ढोबळ आख्यान**

**प्रथम, हे शुन:शेप आख्यान ढोबळपणे काय आहे? (ज्यावर नंतर भाष्य करावे लागेल ते शब्द अधोरेखित केले आहेत.)**

ईश्वाकु वंशात वेधस राजाचा मुलगा हरिश्चंद्र नि:संतान होता. त्याला १०० 'पत्नि' होत्या. त्याच्या घरात 'पर्वत' व 'नारद' दोन ऋषी रहात होते.

हरिश्चंद्राने नारदाला विचारले की

**''हे नारदमुनी, ज्ञानी किंवा अज्ञानी माणूस असो तो आपल्याला एक 'पुत्र' (१) व्हावा अशी इच्छा बाळगतो.** ती कां? पुत्र होण्याने काय फायदा होतो?'' नारद मुनीने त्याचे उत्तर १० श्लोकांत दिले.

१) जर पित्याने जिवंतपणी मुलाचे मुख पाहिले तर त्याचे ऋण फेडले जातात आणि तो अमर होतो.

२) प्राण्यांना (जीवात्म्यांना) जितके भोग पृथ्वी, अग्नि व जल यामध्ये आहेत, त्यापेक्षा जास्त भोग, पित्याला पुत्रामध्ये आहेत.

३) सर्व 'पितालोक' पुत्राच्या मदतीने संकटे पार करतात. आत्मा हा आत्म्यापासूनच उत्पन्न होतो. 'पुत्र' म्हणजे तारणारी एक नौका आहे.

४) लोक असे म्हणतात कीं मलयुक्त रहाणे, बकरीचे चामडे पेहराव म्हणून वापरणे, दाढी व मिशा ठेवणे याने काय फायदा होणार ? 'अविवाहित रहाण्याने काही फायदा होणार नाही), **हे ब्राह्मणानो 'पुत्राची' इच्छा करा !! (२)**

५) अन्न प्राण देते, कपडे रक्षण करतात, सुवर्ण रुप देते, **पशु 'विवाहाने' (३) एकत्र येतात,** स्त्री ही सखी आहे. दुहिता ही कृपेला पात्र आहे पण 'पुत्र' मात्र त्या जगांतही ('लोकात ही') 'ज्योति' स्वरूप आहे.

६) **पती हा गर्भाच्या रूपाने पत्नीमध्ये प्रवेश होतो.** तिच्या पोटी जन्म घेऊन १० व्या महीन्यात प्रगट होतो. **(४)**

७) स्त्री ही 'जाया' ह्या संज्ञेला, पदवीला केव्हां पोंचते तर जेव्हां पती तिच्या पोटी पुत्र म्हणून जन्माला येतो. जे बीज तिच्यांत ओतले जाते तेच पुढे वाढते.

८) मनुष्याला प्रथम देवांनी व ऋषींनी तेज दिले. मग देवांनी मनुष्यांना सांगीतले कीं, आता हीच तुझी 'जननी' आहे आणि तू आता हिच्या मार्फतच उत्पन्न होत जा.

९) ज्याना पुत्र नाही त्यांना लोक | नाही हे सर्व पशु जाणतात. म्हणून तिथे माता व भगिनी बरोबरही 'पुत्र' समागम करतात.

१०) ज्याना 'पुत्र' होतात ते दु:खरहित होऊन चांगल्या मार्गावर चालतात.

पशुपक्षी ही गोष्ट जाणतात व आपल्या मातेबरोबरही समागम करतात.

नारद पुढे म्हणाला की ''राजा वरूणच्या जवळ जा आणि विनंती कर की 'मला पुत्र द्या. **मी त्या 'पुत्राच्या' मार्फत तुमचा यज्ञ करीन. (५)'**

हरिश्चंद्र राजा 'वरूणापाशी' गेला व म्हणाला, 'मला 'पुत्र' झाला की त्याच्यामार्फत मी तुमचा 'यज्ञ' करीन' (६)

त्याला नंतर रोहित नावाचा पुत्र झाला. पण, पुढे

कथा प्रसंग थोड्याशा बाळबोध पद्धतीने पुढे जातो. प्रत्येक वेळेवेळेस, राजाला जेव्हां वरूण यज्ञ करावयाला सांगतो, तेव्हा हरिश्चंद्र राजा कांही कारणे सांगतो, त्यांचा अर्थ, 'रोहित' हा अजून यज्ञाला योग्य झालेला नाही, ही होती.

त्यामुळे, हरिश्चंद्र टाळाटाळी करून, प्रथम त्याला दांत तर येऊ द्या, दांत पडून तर जाऊ द्या, दांत पडून दूसऱ्यांदा येतात ते तर येऊं द्या, आता त्याला 'शस्त्रधारी' तर होऊ द्या, अश्या क्रमाने रोहित वाढत्या वयाने शेवटी 'यज्ञ' योग्य होतो.

पण, त्याला इंद्र भेटतो व त्याच्याकडून त्याला सल्ला मिळतो कीं तू भटकत रहा. म्हणतो **<u>'विचरत' रहा (७)</u>** त्याने तुला श्री मिळेल. भटकल्याने, प्रवास केल्याने फले मिळतील, पाप नाहीसे होईल, भाग्य प्राप्त होईल, अशी ३ वर्षे निघून गेली. नंतर त्याला इंद्राने सांगितले की ''कलीयुगांत कलि जमीनीवर पडून रहातो. द्वापारांत 'उपर मंडराता है' और त्रेत्ता खडा रहता है और सतयुग मे चलता रहता है। इसलिए विचरता रह''।

पांचव्या वर्षी इंद्र पुन्हा भेटला, पुरुष रूपात, व म्हणाला, ''जो विचरता है उसको मधु और उदुम्बर का मीठा फल मिलता है।

त्यामुळे रोहित ६वे वर्ष सुद्धा फिरत राहिला. पण त्याला जंगलामध्ये सुगवस ऋषि चा 'पुत्र' अजीगर्त भेटला. तो जेवतच नसे - अन्न खात नसे त्याला तीन मुलगे होते त्यांची नांवे अशी होती.

**<u>शुन:पुच्छ, शुन:शेप आणि शुनोलांगूल.(८)</u>**

रोहित त्याला म्हणाला, 'मी तुला १०० 'गौ' देतो, तू मला यातला 'एक पुत्र' दे. ज्याच्या योगे मी वरूणाने सांगितलेला 'यज्ञ' करीन.

पण मुलांच्या आईने ज्येष्ठ व कनिष्ठ या दोन्ही मुलांना न देण्याचा निश्चय दाखविला म्हणून मधला मुलगा ('पुत्र') 'शुन:शेप' हा देऊं केला.

इथून खरोखर मुख्य 'यज्ञाची' कथा सुरवात होते. कोणता हा 'यज्ञ'?

वरूण जेव्हां या 'शुन:शेप' पुत्राकडे पहातो तेव्हा 'रोहित' याच्या ऐवजी 'शुन:शेप' हा 'बदली पुत्र' म्हणजे 'क्षत्रियाच्या' ऐवजी 'ब्राह्मण' हा यज्ञाला 'बळी' देण्यासाठी तयार आहे हे पहातो. तेव्हां रोहित काय म्हणतो ते पहा

''मै इसके द्वारा तेरा यज्ञ करूंगा।''

वरूण म्हणतो, 'अच्छा, क्योंकि, **<u>क्षत्रिय से ब्राह्मण और अच्छा।''(९)</u>**

**<u>राज सूय यज्ञ :(१०)</u>**

**<u>वरूणाने नंतर 'राजसूय यज्ञाचा विधी सांगितला.</u>** त्यामुळे 'पशूच्या' ऐवजी 'पुरुष' चा 'बळी' म्हणून यज्ञासाठी विचार केला गेला.

या यज्ञात खालील योजना होती.

होता - विश्वामित्र

अध्वर्यु - जमदग्नि

ब्रह्मा - वसिष्ठ

उद्‌गाता - अयास्य

मग तरीही हा 'बळी' बांधावयाला योग्य इसम निघाला नाही. तेव्हां अजीगर्त म्हणाला की **<u>''मला आणखी '१०० गौ' द्या मग मी बांधतो.''</u>**

तेव्हां पुन्हा '१०० गौ' चा व्यवहार झाला. जेव्हां 'अजीगर्त' तलवार घेऊन 'बलीचा वध' करावयाला सज्ज

झाला. तेव्हां शुन:शेपने हरकत घेतली - व तो म्हणाला <u>**'मी देवतांच्या आश्रयाला मदत मागावयाला जातो. (११)**</u>

नंतरचा घटनाक्रम पहा:


| घटनाक्रम | संदर्भ ऋवेद |
|---|---|
| प्रथम तो 'प्रजापती'कडे गेला | ऋ:१/२४/१ |
| नंतर 'अग्नि'कडे | ऋ: १/२४/२ |
| नंतर 'सविता' कडे | ऋ : १/२४/३-४ |
| नंतर वरूण कडे | ऋ : १/२४/६-१५; १/५५/१-२१ |
| नंतर अग्निस्तुती केली | २२ मंत्र |
| | ऋ १/२६/१-१० |
| | ऋ १/२७/१-१२ |
| नंतर 'विश्वदेव' कडे | ऋ १/२७/१३ |
| नंतर 'इंद्र' कडे | ऋ १/२१-१/३०/ १-१५ |
| नंतर शश्वतूइंद्र कडे | ऋ १/३०/१६ |
| नंतर अश्विनांकडे | ऋ १/३०/१७-१९ |
| नंतर 'उषा' | ऋ १/३०/२०-२१ |

हा यज्ञ लांबवल्या कारणाने वरूणाने इश्वाकूला शिक्षा दिली होती व त्याचे पोट भरले होते. <u>**त्याला 'जलोदर' झाला होता. (१२)**</u>

जसजसे एकएक मंत्र म्हणले गेले तसतसे 'इश्वाकूचे' पोट सुटत गेले. शेवटचा मंत्र म्हणल्यावर अंतिम बंधनही तुटून पडले आणि हरिश्चंद्र स्वस्थ झाला.

### यज्ञात भागिदारित्व

लक्षात ठेवा, कीं येथे इश्वाकु हरिश्चंद्र हा 'अर्जदार'




Pictures N0.3

(Applicant) आहे. ऋत्विज 'शुन:शेपला' म्हणाले - आतां तूं आमच्या सारखा 'अधिकारी' झालास आता तूं स्वत: यज्ञात भाग घे.

मग शुन:शेपने 'अंज सव' म्हणजे 'सोमरसाची' विशेष कृती केली. आणि खालील चार ऋचाच्या द्वारा 'सोमरस' मिळवला. (१३)

ऋग्वेद १/२८/५-८

व नंतर खालील मंत्र म्हणून 'द्रोणकलश' मध्ये सोमरस ठेवला.

मंत्र ऋचा ऋग्वेद १/२८/९

'सोमयज्ञ' केला ऋ १/२९/१-०

नंतर 'अवभृथ' म्हणजे यज्ञाची अंतिम क्रिया

करण्यासाठी सामग्री आणली व दोन मंत्र म्हणून आहुत्या दिल्या. ऋ: ४/१/४-५

मग शुन:शेपने हा विधी संपल्यावर हरिश्चंद्राला 'आहवनीय' च्या जवळ बोलावून (१४) एक मंत्र म्हणाला ऋ. ५/२/७ बध्द शु:शेपाला सहरआवधी यज्ञीय यूपांपासून मुक्त करणाऱ्या हे हेतू आणि ज्ञानवान अग्ने, आमच्याकडे येऊन बध्दकारक पाशांपासून तू आमची मुक्तता कर' - चिमाव शास्त्री

नंतर शुन:शेप विश्वामित्राच्या मांडीवर जाऊन बसला. अजीगर्त ताबडतोब म्हणाला कीं विश्वामित्र माझा पुत्र माझ्याकडे पाठवा. तेव्हां मिळालेले उत्तर फार महत्वाचे आहे. विश्वामित्र म्हणाले,

'नाही ! देवांनी हा मला दिला आाहे. (अरासत) त्याने नाव आतां 'देवरात वैश्वामित्र' झाले आहे. <u>त्याचे 'कापिलेय'आणि 'बाभ्रवं' मंत्र आहेत.(१५)</u>

ह्या पुढील संवाद व घटनासुद्धा महत्वाच्या आहेत. सुयवसचा पुत्रं अजीगर्त शुन:शेपला म्हणाला की ''आम्ही दोघे तुझे आई बाप तुला आतां घरी बोलावित आहोत.

तूं अंगिरस गोत्र असलेल्या अजीगर्तचा 'पुत्र ऋषि' आहेस. तेव्हां हे ऋषे तूं आपले बाप-दादांच्या घरीं ये, घर सोडूं नकोस.''

पण, शुन:शेप, (जो या यज्ञविधीतून संस्कारित झाला आहे व ज्याचे आता, 'कापिलेय' व 'बांभ्रव' मंत्र आहेत) तो ह्याला कबुल झाला नाही. तो म्हणाला,

''तूं माझा यज्ञ होत असताना, 'बलि देण्यासाठी' जी तलवार काढली होतीस आणि पाप केलेस, त्यामुळे तुझी 'शुद्रत्वातून मुक्ति' झालेली नाही. तूं पुन्हा असे पाप कशावरून करणार नाहीस ? तेव्हां मी येत नाही.''

विश्वामित्र ऋषिनी मग त्याला 'पुत्रांमध्ये' सामील केले व त्यांच्यांत ज्येष्ठ पद बहाल केले.

मधुछंदस हा एक विश्वामित्राच्या १०० पुत्रांपैकी एक श्रेष्ठ पुत्र होत, त्याच्यापेक्षा मोठे पन्नास पुत्रांचे मतभेद झाले, ह्या शुन:शेप प्रवेशाने, आणि त्यांनी आपल्या ५० पुत्रांसकट विरोध दर्शविला. तेव्हां, विश्वामित्राने त्यांना शाप दिला कीं ''तुम्हारी संतान अभक्षवाली होगी.'' इस प्रकार अन्ध्र, पुण्ड्र, शबर, पुलिंद. आदि दस्यू लोग <u>विश्वामित्रांचीच संतान आहे. (१६)</u>

मधुछंदस व बाकीचे ५० पुत्र मात्र विश्वामित्राच्या निर्णयाला मान तुकवून संमत झाले. विश्वामित्र म्हणाले 'हे गाधि पुत्रो तुम पुत्रवान होगे, और देवरात के संरक्षण मे फुल - फुलोगे। वह तुमको सत्य मार्ग पर ले चलेगा।'

<u>स्पिरीच्यूअल विद्येचा अधिकारी</u>

हे कुलिक पुत्रो। देवरात के अनुचर बनो। <u>यह तुम्हारा पथप्रदर्शक होगा और हमारी विद्या का उत्तराधिकारी होगा।''(१७)</u>

विश्वामित्र के सब सच्चे पुत्र और 'गाधी'के पुत्र जो देवरात के साथ हुअे उनको धन, यश और कीर्ति की प्राप्ति हुई''

इस प्रकार <u>देवरात दो ऋषियों का वारिस हुआ। 'जहनुं के वंश की संपत्ती का और 'गाधि की वंश की विद्या का। (१८)</u> इथे 'शुन:शेप' आख्यान संपले.

<u>आख्यानाचा अर्थबोध कोणता?</u>

आता आपण या आख्यानाचा पूर्ण अभ्यास करण्याच्या प्रयत्नांशी येऊन ठेपलो.

कसा व कोणत्या उद्दिष्टाने याचा अभ्यास करावयाला हवा?

ह्याचे मुख्य सूत्र म्हणजे ऋग्वेद या भारतीय संस्कृतीच्या मूळ बीजापाशी जाऊन ज्या ऋषी, मुनी, समाजाने किंवा खुद्द ह्या विश्वनिर्मात्याने ह्या आख्यानाच्या रूपाने आपल्याला कोणत्या गोष्टीच्या जाणीवेपर्यंत नेण्याचा खटाटोप केला आहे, तो बघणे महत्वाचे आहे. असे, कां म्हणावयाला हवे तर, वेद हे ईश्वरनिश्वासित ज्ञान आहे!! मानवी बुद्धीच्या पुष्कळ वरच्या स्तरावरचे आहे,!! एवढेच नव्हे, तर मानवीजीवाला - जीवात्म्याला जर 'स्वत:च्या अस्तित्वाचे गूढ' उकलावयाचे असेल तर हे आख्यान कोणत्या 'दिशा' दाखवते? हे कोडे पडत नसेल

तर ते पडावयालाच हवे!! हाच तर पशू - मानव यांत मुख्य फरक आहे, नाही कां? हे मर्त्य जीवन, ही संधी, ह्या कोड्याच्या उत्तरा वाचून गमावली, तर अमृताचा कुंभ जवळ असूनही त्याला हात न लावतां मृत्यू पावलो याचा खेद होईल!!

**<u>अर्थ लावण्याच्या पद्धती</u>**

ह्या आख्यानाचा अर्थ लावतांना भाषा शास्त्राच्या नियमाने शब्दांचे किंवा कल्पनांचे अर्थ, त्या काव्याला सुपरिचित अर्थ असतील तसे व ऋषी, मुनींच्या कल्पना याही ज्या उच्च पातळीवर व दृष्टीकोनावर होत्या त्या उंचीचा आदर करून लावावयाला हवा.

अर्जूनाला 'भगवद्‌गीता गाताना' भगवान श्रीकृष्णाने 'मृत्यू' ह्या संकल्पनेबद्दल जी जाणीव दिली, त्या प्रसंगी अर्जुनाची 'मानवी मृत्यू' ह्या बद्दलची संकल्पना, व श्रीकृष्णाने 'विश्वरूपदर्शन' दाखविल्यावर अर्जुनाला (कौरवांचा, पांडवाचा, सैन्याचा व स्वत:चा मृत्यू जीवंत असताना पहाण्याचे व अनुभवण्याचे जे भाग्य मिळाले.) त्यावेळीच मृत्यूचे खरे ज्ञान अर्जुनाला झाले, तसेच काहीसे खऱ्या अर्थप्राप्तीचे प्रयत्न असावयाला हवेत!!

त्यामुळे, 'सत्यं ज्ञान होण्यासाठी आपल्या ज्ञानाच्याही पलीकडचे व कदाचित धक्का देणारे 'सत्य' असूं शकेल ह्याची तयारी ठेवावी लागते.

**<u>(संकल्पनांचा संख्याक्रम १८ :)</u>**


त्यामुळे, ह्या आख्यानांत ज्या ठोस संकल्पना ह्या 'धक्कास्थितीत' सांपडतील त्यांना मी एक अनुक्रम नंबर दिला आहे व त्यांची पद्धतशीर चर्चा व मांडणी मी योजिली आहे. त्यातील 'निर्णय' अंतिम आहेत असे माझे ही म्हणणे नाही. पण, जर ह्या मांडणीने आख्यानाचा मूळ हेतू व साधनांवर 'प्रकाश' **<u>(गो:किरण)</u>** पडला तर हा उद्योग योग्य ठरेल.

आता पुन्हा कथेच्या गाभ्याकडे जाऊन मी जवळ जवळ १८ संकल्पनांच्या शाब्दिक संज्ञांकडे लक्ष वेधले आहे. त्यावर तुम्ही विचार करा आणि माझ्या विचारांचाही सहानुभूतीपूर्वक विचार करा व सत्य ज्ञानाचा आणि पथनिदर्शक, 'साईन पोस्ट' (Sign Post) ह्या भूमिकेतून त्यांच्याकडे पहा.

Spiritual operation

हे 'आध्यात्मिक ऑपरेशन' नाजूक, दुर्लभ, कठीण आहेच!! पण, फार मोठे ज्ञानाचे भांडार व संलग्न साधना, ह्या खऱ्या अर्थाने उघडण्यास - खुलण्यास कारणीभूत होणार आहे, याची खात्री बाळगा !!

**<u>१) प्रथम 'पुत्र होणे' व 'पुत्र करणे', असे दोन संदर्भ दिसतात.</u>** शारिरीक संबंधातून 'पुत्र' होणे म्हणजे स्त्री पुरुष संबंधातून, पिता, माता ह्या नात्यातून पुत्र होणे हा एक पुत्र शब्दाचा अर्थ आहे. पण, गुरू शिष्य नात्याने, एका गोत्रांत जीवात्म्याला संस्कारणे, ह्या अर्थाने पुत्र हा शब्द ह्या कथेत वापरला आहे. त्यांतील हरिश्चंद्राचा रोहित हा पुत्र शारिरीक जड संबंधातील आहे, तर शुन:शेप ह्याचा अंगिरस गोत्रातून विश्वामित्राच्या पुत्र समूहात झालेले संक्रमण हे एका आपल्याला 'न आकळणाऱ्या संस्कारक्रियेतून' झालेले आहे.



Picture No 7



Pictures N0.8

ह्या क्रियेत हा प्रवास 'राजसूय यज्ञ, ऋवेदातील मंत्र व त्यांतील देवतांच्या आवहनातून व कृपा प्रसादातून झालेला आहे असे दिसेल.

तेव्हा असा पुत्र होऊन त्याच्या यज्ञक्रिया झाल्याने त्याच्या पित्याला 'वैश्विक ऋणातून मुक्त होता येते असा वैश्विक धर्म' (सनातन धर्म) म्हणजेच (Cosmic Law) इथे सांगितला जात आहे. कोण सांगतो आहे हा वैश्विक नियम? नारद मुनी !! होय, हे पटणारे आहे !!

**संस्कार व यज्ञ कशासाठी :**

कां असेल असा नियक? काय हेतू असेल विश्वनिर्मीतीतील ह्या 'पुत्र निर्मीतीचा'?

जर, पृथ्वी, ही 'एक आध्यात्मिक उन्नतिची प्रयोगशाळा' मानली, तर त्यावर चालणाऱ्या अनंतकाळच्या (Natural Life Stream) जीवन प्रवाहाला सातत्याची जरूरी आहे, नाही कां? म्हणूनच, स्त्री पुरुष यांच्या 'मैथूनी क्रियेने' हा हेतू साधला जातो. जीवात्म्याला गर्भाशयांत नवीन प्राकृतिक शरीर लाभते.

पण, मग संस्कार व यज्ञ यांची काय जरूरी? संस्कार कोणावर, कशासाठी?

'पशू' आणि 'माणूस' ह्यांतील फरक जाणल्यास लक्षात येईल की केवळ संस्कारानेच हे अंतर वाढत जाणार आहे. (माणूस हा दिसणाऱ्या सृष्टीच्या सत्यतेचा व स्वत:च्या अस्तित्वाचा विचार करतो.) ह्या संस्कारांचा कायम परिणाम 'आत्म्यावर' हवा असेल, तर त्याच्या पुनर्जन्माची व त्यांतील संस्कारांच्या सलगतेची जबाबदारी सुद्धा निसर्गात हवी, आणि तशी ती आहे, हे सूक्ष्म विचार केल्यावर लक्षांत येईल !!

२) **<u>''हे ब्राह्मणानो पुत्राची इच्छा करा''</u>** हे वाक्य ज्यांना आपण ब्राह्मण आज म्हणतो त्या भिंगातून पाहून चालणार नाही. ज्याने 'ब्रह्म' जाणले व ज्याच्यामध्ये हे 'ब्राह्मण्य' अणूरेणूमध्ये उतरलेले आहे, इथल्या आचार विचार ह्या 'ब्रह्मज्ञानाने' सं(पृत्क) भारलेला आहे, तो 'ब्राह्मण'. भगवद्‌गीतेत कर्म व गुणांने आदर्श विश्वधर्मी, चातुर्वर्ण्य, सृष्टीत व मानवी, समाज परिस्थितीत जन्म घेतो आहे व तसे बरहुकुम आचरण ठेवतो तो खरा ब्राह्मण होय!!

मग ह्या 'ब्राह्मणाने पुत्राची' अपेक्षा ठेवावी म्हणजे नक्की व नेमके काय? एक अर्थ सोपा सरळ म्हणजे लग्न करून एका 'पुत्राला' जन्म द्यावा. म्हणजे अनुवांशिक गुणाने तो 'ब्राह्मण' ठरेल हा 'भौतिक सामाजिक अर्थ' झाला.

**भौतिक विकृत अर्थ नाही :**

पण, सध्याच्या राजकीय सत्ताधारी पुरुषाला जसे आपल्या 'पुत्राने' ह्या लोकसभेच्या, राज्यसभेच्या, लोकप्रतिनिधिक पदावर विराजमान व्हावे असे वाटते. त्या 'अधिकाराची' प्राप्ति केवळ आपल्या पोटी जन्म घेतल्याने होते, 'असा राजकीय समज' येथे अभिप्रेत नाही !! तर,

रामकृष्ण परमहंस यांनी 'नरेंन्द्र दत्त' ला (विवेकानंद) 'पुत्र' बनविला, निवृतिनांथांनी ज्ञानेश्वरांना जसा 'पुत्र' बनवला, गोपाळ कृष्ण गोखले यांनी महात्मा गांधीना आपला 'राजकीय पुत्र' बनवला. तसा 'ब्राह्मणाला' पुत्र व्हावा व अशी इच्छा त्याने बाळगावी हा विचार आाहे.

३) <u>**''पशु विवाहाने एकत्र येतात.''**</u> पशु प्रत्यक्ष वैषयिक मैथूनाने एकत्र येतात हा भ्रम आहे. ते शरीराने एकत्र येतात. आत्म्याने 'एकात्म' होत नाहीत. मग स्त्री पुरुष ''विवाह'' ह्या '१६ संस्कारातील स्पिरीच्यूअल क्रियेने - संस्काराने 'एकत्र' येतात. हा 'संस्कार' 'वैश्विक स्पिरीच्यूअल अग्नि' मार्फत होतात.. ह्या 'अग्नि' वर अनेक ऋचा चारी वेदांत, अनेक ऋषींनी सांगितल्या आहेत. त्यांना 'मंत्रसामर्थ्य' आहे. (८) महायोगी अरविंद यांनी प्रचंड अभ्यास करून 'Hymns on Agni' पुस्तक लिहीले आहे. ह्या अग्निलाच स्त्री पुरूष ह्या भिन्नलिंगी शरीरधारी आत्म्यांना 'एकत्र' आणण्याचे सामर्थ्य आहे. एक उदाहरण बघा - दोन लोखंडाच्या 'कांबी' ह्या 'वेल्डिंगने' सांधल्या जातात, तेव्हां त्यांचा 'संधि एकजीव होतो, तिथेही जड विद्युत अग्निची (Electric Spark) जरूरी लागते, हा आपला अनुभव आहे ना!! 'विवाह संबंध ह्या एकात्मतेचा आहे..'

(६) <u>**''पती' हा गर्भाच्या रूपाने 'पत्नीमध्ये प्रवेश करतो.''**</u> तिच्या पोटी जन्म घेऊन १० व्या महीन्यात प्रगट होतो.

येथे 'पुरुष' हा शब्द महत्वाचा आहे. हे 'दशांगुले 'पुरुष बीज' 'तत्वाने' संबोधिला आहे. 'पुरुषसुक्त' मध्ये वैश्विक निर्मीती मध्ये अक्षर, क्षर व दशांगुले पुरुष, ही जी 'संकल्पना' व्यक्त केलेली आहे. ती ह्या जड पृथ्वीवर प्रकृती, तारे, ग्रह यांच्या मदतीने व 'पंचाग्नि विद्येने' साकार होते!! 'छांदोग्य उपनिषदांत' ज्या ५ 'अग्निहोत्रांचा' उल्लेख आहे, त्या विद्येने एका नव्या 'जीवात्म्याला' पृथ्वीवर प्रकट करते. त्यांत 'योनि' व 'लिंग' यांच्या 'मैथुनी क्रिया' होतात. त्यांचा संबंध पुन्हा पुढे 'सोमरसाच्या प्राप्तिसाठी होणाऱ्या सोमयागाच्या वर्णनाच्या वेळी करूया. ह्या पंचाग्नि विद्येत ३ अग्निहोत्रे अव्यत्त जगांत (unminifest) व दोन व्यक्त (Manifest) (जड पृथ्वीवर) जगांत होतात. त्यांतील एक 'स्त्री-पुरुष मैथून' व दुसरे अग्निहोत्र स्त्रीच्या गर्भाशयांत जीवाचा जीवात्म्याचा प्रवेश व नंतर १० महीने वाढ हे होय. मानवी जन्माचे हे वेदिक स्वरूप होय !!

<u>**५) ''मी त्या पुत्राच्या मार्फत तुमचा यज्ञ करीन''**</u>

'वेदिक यज्ञ' ह्या संकल्पनेवर मी दिशाच्या मागील कित्येक अंकात सविस्तर मांडणी केली आहे. ती सध्या ज्या तऱ्हेच्या 'यज्ञ' कृती केल्या जातात, त्यापासून भिन्न आहे. यज्ञाची कृती ही Human Consciousness 'मानवी कॉंशसनेसची' आहे. 'मस्तिष्क' हे त्यांतील 'यज्ञकुंड' आहे.

आतां येथे हा भौतिक पशू वृत्तीचा मानवी देहातील मुलगा (पुत्र) ह्याला एका विशिष्ट यज्ञाने (Transform) संक्रमित करण्याचा 'संस्कार यज्ञ' येथे अभिप्रेत आहे. लौकिक मानवी पशूजीवनाला हा संस्कार आवश्यक वाटत नाही. पण, ज्या वेदिक संस्कृतीत, मानवी समाजाला दैवी स्थानांपर्यंत उन्नत करण्याचा, चंग बांधला आहे, त्याचा ऋग्वेदात ह्या आख्यानामार्फत (उद्योग) वर्णन केला आहे. त्यांतील, ह्या यज्ञाला आवश्यक न मानणारा वर्गच समाजात अधिक प्रमाणात आहे. त्या विरोधाचे दर्शन इथे घडते आहे. आज आपल्या भौतिकवादी सेक्यूलर समाजाला हे 'अप्रुप' आहे, नाही कां?

**७) <u>'तू विचरत रहा'</u> (चरैवेति-ऐतरेय उप. नि.)**

ह्याच्या अर्थ ह्या भौतिक जीवनाच्या काही

आवश्यक ज्ञान प्राप्तिसाठी तू 'विचरतं रहा, प्रवास करीत रहा, अनुभव घेत रहा किंवा आध्यात्मिक अर्थाने पृथ्वीवरच्या जड विद्या, म्हणजे 'अविद्या' ह्यांची प्राप्ति सुध्दा आवश्यक आहे, हा असा करावा लागेल. कारण, अनुभवाच्या पोकळीवर ब्रह्मज्ञान अशक्य आहे. त्यामुळे भौतिक ज्ञान हे स्पिरीच्यूअल ज्ञानाचे एक 'प्रतीकात्मक (रूप) आहे. त्यावर आधारलेल्या खऱ्या सत्यज्ञानाकडे जाता येते. पण, तिथेच थांबण्याची चूक 'रोहित करतो'. जसे सध्या सगळे भौतिकवादी शास्त्रज्ञ व विचारवंत करताहेत!!

### (८) शुनःपुच्छ शुनःशेप, शुनोलांगुल :

इथे आता शब्दांचे अर्थ कसे लावावयाचे याबद्दल मौलिक विचार आहे. आज आपण 'शब्दकोश' अर्थ शोधण्याकरितां आधार मानतो. पण, शब्दाला हा जो रूध्द (थांबलेला) अर्थ दिला जातो ही पद्धती 'योगिक' अर्थ पद्धती नव्हे. इथे अर्थ हा 'Dynamic' प्रवाही व संवादी भाषेच्या उद्दिष्टांशी प्रामाणिक राहून लावावा लागतो.

ह्या तीन मुलांच्या नावात 'शुनः' हा शब्द सारखा आहे. शुन ह्याचा अर्थ कुत्रा आहे. आपल्या तीन मुलांना 'कुत्रा' ह्या अर्थाचे नांव कुठला बाप लावील. विशेषत: हा बाप 'अजीगर्त' म्हणजे सुयवस ऋषीचा पुत्र आहे.

(शुन चा अर्थ सुख, कल्याण असाही आहे. 'शेप' याचा अर्थ 'स्तंभ' अथवा 'खांब' असा आहे. शिवाय आपटे यांच्या शब्दकोशात शेपः, शेपस् याचा अर्थ The Penis, testicle, tail म्हणजे लिंग, शेपूट असाही आहे.)

त्यामुळे, पुढे येणाऱ्या यज्ञाच्या संदर्भात यज्ञाला जो 'यूप' म्हणजे खांब लागतो तो व सोमरसाच्या प्राप्तिच्या उद्दिष्टाने वीर्याशी असलेला संबध दृष्टि पथात येतो. शिवाय ज्या वरूणपाशांनी, हा जो जीवात्मा 'पाशबद्ध' आहे




Pictures N0.4


त्याच्या संदर्भात खांबाला बांधून 'बली' देण्यची संकल्पना आहे, त्याची भौतिक चित्रकृती डोळ्यासमोर प्रतीकात्मक ठेऊन, खरोखर सत्यस्थितीत व आध्यात्मिक क्रियेचा संदर्भ समोर ठेवून, हा जीवात्मा ज्या भौतिक सुखदु:खाने जखडलेला किंवा बांधलेला आहे, तो 'राजसूय यज्ञाने' त्यातील खांबाला (यूप) ला बांधून 'बळी' देण्याचे योजिले आहे. हे दृश्य सत्य मानावे लागेल व तसा अर्थ करावा लागेल.

#### <u>पशुवृत्तीचा बळी :</u>


इथे बली याचा आध्यात्मिक अर्थ पशूवृत्तीचा बळी होय व यूप, खांब किंवा शेप म्हणजे मानवी शरीरातील 'मणका' असा करावयाला लागेल.

#### <u>उर्ध्वरेत क्रिया :</u>

ह्या पाठीच्या अस्थिरूप मणक्यातूनच सुषुम्ता नाडीतून उर्ध्वरेत, अशी वीर्यातील सुप्त गति सहर रआ



Picture No 5




चक्रात जाते व मास्तिष्क किंवा 'स्पिरीच्यूअल यज्ञकुंडात' जाऊन सोमरसात उत्क्रांत होते.

**महायोगी अरविंद अर्थ पद्धती :**

त्यामुळे अत्यंत महत्वाचा नियम म्हणजे वेदातील अर्थाचे गूढपण हे व्याकरण शास्त्राच्या आधाराने सुटणार नसून ते या ठिकाणी 'उर्ध्वरेत' वीर्याच्या 'योगिक क्रियेच्या' अनुभूतीजन्य ज्ञानाच्या आधारावरच होणार आहे. त्यामुळे ज्या वेदविव्दानांनी केवळ सायणाचार्यांच्या भिस्तीवर अर्थ लावण्याचे प्रयत्न केले त्यांना खरे अर्थ प्राप्त झाले नाहीत. महायोगी अरविंद यांनी Secrets in Vedas वेदातील रहस्य ग्रंथात जे मार्गदर्शन केले ते इथे उपयुक्त ठरते.

**९) ''क्षत्रिय से ब्राह्मण और अच्छा'' :**

वरूणला इथे यज्ञ करावयाचा आहे त्यातील वस्तु, 'समिधा' कोणत्या? समिध् याचा अर्थ यज्ञात पवित्र अग्निला 'समर्पण' करावयाची वस्तू (लाकूड, काड्या) (Apte, P588) इथे ही वस्तू क्षत्रिय कीं ब्राह्मण असा प्रश्न आहे व त्यात ब्राह्मण जास्त योग्य असा अर्थ आहे. ह्याचा उघड अर्थ, यज्ञ याचा जो इंग्रजांनी Sacrifice 'बली' असा एखाद्या तुरूंगातील गुन्हेगारी माणसाला वधस्तंभ द्यावयाचा असा अर्थ लावला. तो तसा नसून, मानवी काँशसनेसच्या उन्नति करण्याच्या उद्दिष्टाने योग्य प्राथमिक प्रयोग वस्तू कोणती? असा अर्थ लावावयाला हवा!! त्या अर्थाने चातुर्वर्ण्याच्या सिध्दांताप्रमाणे क्षत्रिय व ब्राह्मण ह्यांतील 'ब्राह्मण' ही चीजवस्तू जास्त योग्य असे विधान केले आहे असा अर्थ जास्त योग्य वाटतो. जसे सोलर एनर्जीने (Preheated) 'प्रिहिटेड' तपमानाचे पाणी नंतर जास्त तपमान विद्युत शक्तीने करण्यात बचत होते तसे !!

**१०) ''राजसूय यज्ञाचा विधी''- वरूणाने सांगितला :**

हा 'राजसूय एखाद्या सम्राटाचा दिग्विजय झाल्याच्या समारंभासारखा नाही, हे लक्षात घ्या. इथे 'राज' ह्याचा अर्थ 'गुहयं' म्हणजे सर्वसाधारण भौतिक दृष्टिला न दिसणारी कृती असा करावा लागेल व म्हणूनच तिथे बली देण्याचा विधी तलवार वापरून नव्हे तर निरनिराळ्या देवतांच्या शक्तीने शुन:शेपच्या पशु वृत्तींचा बळी आणि

मानव आणि दैवी गुणामध्ये संक्रमण करण्याचा 'स्पिरीच्यूअल यज्ञ' 'आध्यात्मिक यज्ञ' असा करावा लागेल. त्यामुळे आर्यांच्या यज्ञात पशूबळी किंवा मनुष्यबळी देत होते, या अपप्रचार व प्रवादाचा यथातथ्य निकाल लागेल अशी सत्य यज्ञाची कृती आहे

**११) <u>नंतरचा घटनाक्रम पहा :</u>**

यानंतर ज्या 'देवता शक्तींचा' उपयोग यज्ञात होतो आहे त्यांची नावे क्रमाने अशी आहेत. १) प्रजापती २) अग्नि ३) सविता४) वरूण ५) विश्वदेव ६) इंद्र ७) शश्वइंद्र ८) अश्विनी ९) उषा.

डॉ. सिद्धेश्वर शास्त्री (चित्राव शास्त्री) यांच्या मताप्रमाणे. ''शुन:शेपाला यज्ञीय युपाला बांधून त्यास बळी देण्याची सारी तयारी पूर्ण झाली असतानाच यज्ञपुरोहित विश्वामित्राला त्याची दया आली आणि त्याने त्यास विभिन्न देवतांचा धावा करण्यास सुचविले. शुनःशेपाने केलेला विभिन्न देवतांचा धावा ऋग्वेदातील २४-३० सूक्तामध्ये ग्राथित केला आहे. हे भाष्य उघउ उघड सुसंगत नाही॥ याउत्तर 'वैश्विक अग्नि देवता हे बळी व पापमुक्ति चे काम करते. ऋग्वेद सूक्त <u>(५.२)</u> मध्ये भाषांतर असे आहे.

'बध्द शुनःशेपाला सह स्त्रावधी यज्ञीय युपांपासून मुक्त करण्याऱ्या होतृ आणि ज्ञानवान अग्ने आमच्याकडे येऊन बद्धकारक पाशांपासून तूं आमची मुक्तता कर. त्यामुळे कॉंशसनेस (आत्म्याला) असणाऱ्या पाशांपासून मूक्त करण्याऱ्या 'सर्जन ऋषिला' ला दया आली कां उलट त्याने 'शास्त्रीय वृत्ती' ठेवून अत्यंत उपकारक अशी 'स्पिरीच्यूअल यज्ञ क्रिया' शास्त्रीय पद्धतीने वैश्विक स्पिरीच्यूअल शक्ति देवतांच्या मदतीने केली? यामुळे वैचारिक सामान्य कल्पनाशक्तिच्या स्वरूपांत केलेल्या वेदांच्या भाषांतरामुळे मूळ यज्ञक्रियांबद्दल कसे गैरसमज निर्माण झाले, याचे हे एक उत्तम उदाहरण आहे. यावर आपण नंतर सविस्तर भाष्य करूचं!!

**१२) <u>इश्ववाकुला ....'जलोदर' झाला होता:</u>**

हा प्रकार 'आयुर्वेद' शास्त्राच्या भागांत येऊं शकतो म्हणून त्याची सविस्तर मांडणी व शोध आपण नंतर घेऊं!!

१३) <u>चार ऋचांच्या द्वारे सोमरस मिळवला.</u> 'सोमरस', पवमानसूक्त ह्यावर एव्हढे गैरसमज आहेत कीं त्याकरितां एक स्वतंत्र लेख लिहीणार आहे.

**१४) <u>''हरिश्चंद्राला आवहनीच्या जवळ बोलावून एक मंत्र म्हणला''</u> :**

ह्या 'आवहनीय अग्निचे आवाहन सहरस्त्रारचक्रांत - 'शुन:शेपाच्या मस्तकांत' होत असते, तिथे हरिश्चंद्राला बोलावणे याचा अर्थ गहन आहे तो पुढच्या लेखात मांडू या.

**१५) <u>''त्याचे 'कापलिय' आणि 'बाभ्रव मंत्र' आहेत''</u> हा विषय विशेष संशोधनाचा आहे.**

शुन:शेपाचे 'देवरात वैश्वमित्र' ह्या स्वरूपांत संक्रमण झाल्यावर त्याचे हे नवीन मंत्र बनतात ह्याची चर्चा पुढच्या लेखांत करू या.

**१६) <u>''विश्वामित्राची संतान''</u>**

शारिरीक संबंधातून होणारी संतान किंवा केवळ सांप्रदायिक गटामधील सभासद आणि त्यापेक्षा वेगळा ज्ञानवान पुत्र ह्यामधील मूलभूत फरक लक्षात घ्या!!

**१७) <u>यह तुम्हारा पथप्रदर्शक होगा :</u>**

ह्याचा अर्थ ह्या 'आध्यात्मिक विद्येचा' नवीन मार्ग निर्माण झाला. त्यावर चालण्याचा एक संप्रदाय चालू झाला. त्यांचा मार्ग चिरंतन व युगायुगात संक्रमण होणार आहे. त्याला अनुयायी म्हणजे 'पुत्र' लाभणार आहेत.

ही एक 'विद्या' अवगत झाली आहे.

**१८) ''दो ऋषियों का वारिस हुवा... जहनु को वंश की संपत्ति का और गाधिको वंश की विद्या का''**

इथे दोन तऱ्हेच्या गोष्टींचे संक्रमण किंवा अधिकार प्राप्तिचा उल्लेख आहे.

एक म्हणजे सांप्रदायिक, शारिरीक पद्धतीने म्हणजे Biological मिळणारा अधिकार वा गुण प्राप्ति, व दूसऱ्या बाजूला यज्ञ संस्काराने मिळालेली 'आध्यात्मिक उंची' व अधिकार. ह्या दूसऱ्या प्रकाराला 'विद्या' असे अत्यंत योग्य असे वैदिक संज्ञेतील नांव दिलेले आढळेल !!

<u>आख्यानाचा मतितार्थ</u> :

शेवटी एकदा, आतां आपण ह्या ऋग्वेदातील आख्यानाच्या सर्वसाधारण कथेशी परिचित झालो. एव्हढे निश्चित लक्षात येईल की एक कपोलकल्पित कथा म्हणून ह्या आख्यानाला 'उडवून' देण्या इतकी ही 'अर्थशून्य' बडबड नाही. मग, प्रथम ह्याचे सध्याच्या ज्ञानपद्धतीच्या पातळीवर जास्तीतजास्त कोणते सुसंगत आध्यात्मिक (Spiritual) अर्थ लावतां येतील ते पाहू या !!

१) तत्वज्ञानाच्या चर्चेत ज्या गोष्टी ध्यानात येतात, त्यापेक्षा जास्त खोलवर त्या तत्वज्ञानातील सूचित केलेल्या 'आध्यात्मिक पातळीवर केलेल्या संक्रमणाच्या साधना पद्धतींमुळे, यज्ञकृतींमुळे, आंतरिक योगिक क्रियांच्या साधनेनेच केवळ खऱ्या बोधज्ञानाची प्राप्ति होते. त्यामुळे, आख्यानांच्या खटाटोपाला मानवी बुद्धीच्या आकलनशब्दींचा व गूढ यज्ञकृतींचा एक संदर्भ आहे. तो अत्यंत महत्वाचा व आवश्यक आहे.

२) ह्या आख्यानात ज्या आत्मपाशांचा संदर्भ आहे त्याची जाणीव मानवाला होणे ही अत्यंत महत्वाची बाब आहे. हे पाश कोणते, त्यांची योजना कां झाली असावी व त्यांच्या मुक्ततेने काय लाभ होणार यांची माहिती होणे अत्यंत महत्वाचे ठरावे !!

३) वेदांचे अर्थ लावतांना बुध्दीगम्य ज्ञानाला आवश्यक ठरणाऱ्या 'यज्ञकृती' म्हणजे १) उध्वरेत कुंडउलिनी जागरण २) श्रीविद्या - पाशमुक्ती ३) सोमरस व शेवटी ४) उषाचा उदय (Rise of Divine Consuciousness) ह्या सर्वाचा विचार पुढल्या लेखांत जरूर करूया.

**यशवंत साने**

सोनल अपार्टमेंट, सारस्वत बँकेशेजारी,
अग्यार लेन, ठाणे
Tel. 25368450
E mail;: yrsane@eth.net

•••

दि
शा
नियमित
वाचा.

आपली
मते
जाणून
घेण्यास
आम्ही
उत्सुक
आहोत.

### प्रकरण चौथे

# अरूणाचलम येथील रमण महर्षी

*अरुणाचलमचे रमण महर्षी यांच्या चरित्राचा हा शेवटचा भाग देत आहोत - संपादक*

**ध्यान धारणा -**

ध्याना मध्ये निर्माण झालेली मनोवस्था सवयीने तशा प्रकारे सांभाळता येते. त्याच मनोवस्थेत एखादी व्यक्ती काम अगर निरनिराळी कार्ये करू शकते. त्याला अडथळा येत नाही. अशा व्यक्तीला ध्यान आणि इतर लौकिक कार्ये यामध्ये फरक जाणवत नाही. मी कोण आहे? यावर तुम्ही ध्यान केले आणि तुम्हाला मी म्हणजे शरीर नव्हे किंवा मेंदूही नव्हे अगर इच्छाही नव्हे हे समजून आले तर, मग ह्या प्रकारच्या तुमच्या आंतर शोधाचे उत्तर सखोल, अंतरंगातून आपोआप गाढ साक्षात्कार रूपाने तुम्हांला अनुभविता येईल.

स्वत: कोण हे समजून घ्या आणि मग सत्य ताबडतोब सूर्यप्रकाशासारखे तुमच्या हृदयात उजळून निघेल. मन दु:ख-रहित होईल आणि खरा परमानंद होईल, आंनद व खरा मी एकरूपच आहेत. स्वत:च्या सत्येतविषयी अज्ञान असल्याने जग इतके दु:खी आहे.

आनंदमयता हा मानवाचा स्वभाव आहे. तो आंनद जन्मसिद्ध आहे. म्हणूनच माणसाला तो सापडतो. तेव्हा त्याला सुख - समाधानाचा लाभ होतो. त्या लाभाचा अंत कधीही होत नाही.

**महर्षींचा आजार -**

ख्रिस्ताब्द १९४८ च्या शेवटी भगवानांच्या डाव्या हाताच्या कोपरावर सुपारी एवढी गाठ झाल्याचे दिसून आले. ती आकाराने हळूहळू वाढत गेली. स्पर्श झाला असता दुखावयास लागे. फेब्रुवारी १९४९ मधे ती गाठ लिंबाएवढी मोठी झाली. आश्रमाला भेटीसाठी येत असलेल्या डॉक्टराने ती कापून काढली. त्यानंतर झालेली जखम दहा दिवसात भरून आली. मार्च मधे भगवानांच्या मातोश्रींच्या समाधीवर बांधलेल्या मंदिराचा महाकुंभाभिषेक होता. त्यावेळी भगवानांची प्रकृती बरी होती. काही दिवसानी पुन: गाठ त्याच जागेवर आली. मद्रासहून आलेले चिकित्सक, नामवंत शल्य विशारद् चिकित्सा करून गेले. ती गाठ अत्यंत घातकी असल्याचे सांगून मार्च २७ रोजी शल्यछेद करून ती गाठ काढून टाकली. त्या जागेवर रेडिअमचा इलाज केला. त्या गाठीची चिकित्सा करण्यात आली. तिचा संसर्ग शरीरातील इतर पेशीशी असल्याचे ध्यानात आले. जी जखम भरून निघाली, मात्र दुसरी गाठ दिसू लागली. भगवानांचे जीवित वाचविण्यासाठी रोग ग्रस्त भागापासून हात कापू टाकण्याचा प्रस्ताव मांडला. भगवान म्हणाले - भयभीत होण्याचे कारण नाही. शरीर हाच एक रोग आहे. त्याचा नैसर्गिक शेवट होऊ द्या. त्याला छिन्नविछिन्न का करावे? जखमेला साधी पट्टी बांधा. तेवढे पुरेसे आहे.

यानंतर एक नामकित वैदू झाडपाल्याचा इलाज करू लागला. पण त्याला यश आले नाही. ती जखम चिघळली. तीत पू झाला. डॉक्टरांच्या सल्ल्याने तिसऱ्यांदा शस्त्रक्रिया करण्यात आली. ७ ऑगस्ट रोजी केलेली शस्त्रक्रिया बरीच मोठी होती. काळजीपूर्वक शस्त्रक्रिया झाली. रेडिअमच्या इलाजाने रोगग्रस्त पेशींचा नाश करण्यात आला. जखम भरून येऊ लागली. आणि

प्रकृतीत पण सुधारणा होऊ लागली. सर्वांनी समाधानाचा सुस्कारा सोडला. नोव्हेंबर अखेरीस जीव घेणी गाठ हाताच्या वरच्या बाजूला दिसू लागली. १९ डिसेंबर रोजी चौथी शस्त्रक्रिया करण्यात आली. होमिओपथीचा इलाज चालू ठेविला. रोग कमी झाला नाही. उलट दुसरी गांठ डाव्या खाकेजवळ दिसू लागली. इतकेच नव्हे तिची झपाट्याने वाढ झाली. दोन नामांकित आयुर्वेद तज्ञानी इलाज केले. गुण आला नाही. डाव्या हाताचा दंड भरमसाट सुजला. त्या गाठीतून सारखे रक्त ठिपकू लागले. शरीरात रक्ताची कमतरता जाणवू लागली. त्या रोगाचे विष संपूर्ण शरीरभर पसरले. ही शेवटची स्थिती होती. भगवानांचा शेवट जवळ आला.

शारीरिक आजार व त्यापासून होणाऱ्या यातना या पासून भगवान अलिप्त होते. कोणताही इलाज करण्याची आवश्यकता नसल्याचे त्यांचे मत होते. जे काही घडत आहे ते आपण पाहावयाचे आहे. भगवान एका भक्ताला हसून म्हणाले - मी इलाज करा असे कधीतरी सांगितले का? तुम्हाला ते पाहिजे होते. आता तुम्हीच काय तो निर्णय घ्या. मला विचारत असल्यास इलाज करण्याची गरज नाही. जे घडले ते घडू द्या. भगवानांची इलाजाबद्दल उदासीनता डॉक्टरांना थक्क करणारी होती. भगवानांचा विनोदी स्वभाव सर्व इलाज करतानाही तसाच होता. त्यांच्या सहज विनोदामुळे डॉक्टर चिंता विसरून जात. भगवानांना न हलण्याचा सल्ला देऊन डॉक्टर निघून गेले. ते जाताच भगवान दालनात आले.

**शेवटचे काही दिवस -**

५ जानेवारी १९५० रोजी श्री रमण महर्षी यांचा ७१ वा वाढदिवस साजरा झाला. भगवान त्या कार्यक्रमाला उपस्थित होते. भक्तगणाबरोबर ते बराच वेळ बसले. भक्तांनी स्तोत्रे म्हटली. अरुणाचलमूचा हत्ती आला. त्याने सोंडेने भगवानाच्या पायाला स्पर्श केला आणि निघून गेला. उत्तर भारतातून आलेल्या एका राणीने याचा चलत् चित्रपट घेतला. संपूर्ण वातावरण आनंदाने भारलेले होते. वेद मंत्रांचे पठन झाले. गुरू वंदनाने कार्यक्रमाची सांगता झाली. भगवानांना आराम पडावा म्हणून आश्रमात बाहेरही प्रार्थना करण्यात आली. असे पुष्कळ दिवस गेले.

भक्तांनी भगवानाना विचारले व विनविले - आपण स्वत:च्या इच्छाशक्तीने बरे होण्यासाठी काही करावे. तेव्हा भगवान म्हणाले - योग्य वेळी सर्व काही योग्य होईल, शिवाय इच्छा करणारे इथे कोण आहे? विश्व जाणिवेमध्ये व्यक्तीची इच्छा विरून गेल्यानंतर निराळी इच्छा करणे कसे शक्य आहे?

त्यांच्या महानिर्वाणापूर्वी काही दिवस आधी भगवानांनी श्रीमत् भागवत मधील एका श्लोकाचा उल्लेख केला. (भाग अ. ११. प्र. १३ श्लोक ३६) व तो तामिळ काव्यात सांगितला. सारांश - कर्माचे फळ मिळालेले हे शरीर विश्रांती घेऊ दे किंवा इकडे तिकडे फिरू दे वा मरू दे अगर जगू दे. दारू प्यालेल्या एखाद्या मनुष्याला त्याच्या कपड्याची जशी जाणीव नसते, तसे ज्या संताला स्वत:चे ज्ञान झालेले आहे, त्याला शरीराची जाणीव नसते. १९४९ च्या शेवटी योग वसिष्ठ मधल्या एका श्लोकावर प्रवचन करताना ते म्हणाले - ज्या ज्ञान्याला स्वत:ला काही आकार नाही तो केवळ विशुद्ध ज्ञानरूप आहे हे उमजले असता त्याच्या शरीराला तलवारीने कापले तरी त्याच्या शुद्ध जाणिवेवर काहीही परिणाम होत नाही. उसाचे तुकडे केले, वा त्याला चरकात घालून पिळले तरी त्याची गोडी जात नाही. अखेरच्या महिन्यात एका सेवेकऱ्याला भगवान म्हणाले - आपले जेवण झाल्यावर ज्या पानावर आपण जेवलो तेच पान परत ठेवतो का? दुसऱ्या एकाला म्हणाले - ज्या प्रमाणे मजूर त्याच्या डोक्यावरील भार ठिकाणावर पोचल्यानंतर खाली उतरवून ठेवण्यात आनंद मानतो तसे ज्ञानी मृत्यूमुळे आपल्या शरीरापासून सोडवणूक करून घेण्यात आनंद मानतो.

*जेथे प्रेम असते, तेथेच चमत्कार घडतात. - विल्स कॅथर*

भगवान एकदा एका भक्ताला म्हणाले - कोणी या शरीरालाच भगवान मानतात आणि या भगवानाच्या माथी यातना मारतात, ते भगवानाच्या वियोगाच्या कल्पनेने निराश झाले आहेत. पण भगवान कुठे आणि कसा जाणार? एका सेवेकऱ्याचे हसत स्वागत करून भगवान म्हणाले - मोक्ष म्हणजे काय? हे तुला माहीत आहे काय? तो शांतपणे स्वामीकडे पाहू लागला. भगवान म्हणाले - जे दु:ख प्रत्यक्षात नाही ते सोडून देणे आणि जो फक्त अस्तित्वात आहे असा शाश्वत आनंद मिळविणे. ही मोक्षाची व्याख्या आहे.

अगदी शेवटच्या दिवसांत भगवान आपल्या बिछान्यावर बसून अनेक भक्तांना दर्शन देत असत. अगदी शेवटच्या संध्याकाळ पर्यंत दर्शनाचा कार्यक्रम चालू होता. त्यांची प्रकृती झपाट्याने ढासळत होती. ही बातमी वाऱ्यासारखी सर्वत्र पसरली. शेकडो भक्त भगवानांच्या दर्शनासाठी तिरुवन मलाईला येऊन थडकले. दर्शनासाठी रांगा लागल्या. त्यात बायका, मुले, पुरुष, परदेशी नागरिक आदि अनेक दर्शनार्थी होते.

**महानिर्वाण -**

गुरुवारी सकाळी रक्तामुळे चोंदलेली फुफ्फुसे मोकळी व्हावीत म्हणून डॉक्टरानी काही औषधे देण्यासाठी आणली. तेव्हा भगवान म्हणाले - त्याची आता जरूर नाही. सर्व काही दोन दिवसात ठीक होईल. त्या रात्री ध्यानासाठी स्वत:ला एकटे राहू देण्यास सांगितले. १४ एप्रिल १९५०, शुक्रवारी सकाळी एका सेवेकऱ्याने मालीश केले. भगवानांनी आभार मानले. त्या सायंकाळी भगवानांचे सर्वाना दर्शन घेता आले. भगवान अत्यवस्थ असल्याने बरेच लोक आश्रमातच राहिले. सूर्यास्तानंतर बसते करण्याची भगवानानी इच्छा केली. त्यांच्या डोक्याखाली हात घालून त्याना बसते केले. ऑक्सिजन लावण्यास मनाई केली. मंडळी बाहेर बसून 'अरुणामचलम् शिव' म्हणू लागली. ते दृश्य पाहून भगवानांचे डोळे क्षणभर चमकले. आनंदाश्रू ओघळले. श्वास मंद होऊ लागला. त्याच वेळी एक तेजस्वी उल्का दक्षिणेकडून येताना स्पष्टपणे दिसली. ती उत्तरेकडे सरकत अरुणाचलम्च्या शिखरा पलीकडे जाऊन गुप्त झाली. त्यावेळी घड्याळ्यात ८.४७ झाले होते. याच क्षणी महर्षींनी शेवटचा श्वास घेतला होता. आकाशातील तो तेजस्वी तारा दक्षिण हिंदुस्थानात अनेकांनी पाहिल्याची वृत्तपत्रात ठळक माहिती होती. हे ज्या लोकानी पाहिले व ज्यांना शक्य होते अशी मंडळी मद्रासहून तिरूवनमलई कडे ताबडतोब निघाली.

भगवान सत्याकडे, विश्वाच्या अंतरंगाकडे परत गेले. त्याक्षणी पसरलेली अलौकिक शांतता प्रत्येकाला भावना विवश करून गेली. हा त्या भगवानाचा - पसत्पर व तेजस्वी आत्म्याचा अलौकिक महिमा होता. तेजोमय शाश्वत अस्तित्वात मी येथे आहे. असा संदेश त्यांनी दिला. अगदी उघडपणे आहे.

भगवान तीस वर्षाहून अधिक काळ त्यांच्या भक्तांबरोबर बसत असत. त्या जुन्या दालनतील पलंगावर त्यांचे पूर्णकृती तैलचित्र सांप्रत ठेवलेले आहे. पूर्वी इतक्याच प्रभावीपणे त्यांची उपस्थिती त्या जागेत ध्यान धारणा करण्यासाठी बसतात, त्याना अद्यापही जाणवते.

स्तुत्य असे पूर्व संचिताचे रमण नांवाचे बीज त्यांच्या जन्म स्थानी उगवले. ते अरुणाचलमूला वाढले, आणि त्याला फळही आले. त्या शुद्ध बीजाला अरुणाचलम् सारखी पविथ भूमी आणि परमात्म अनुग्रहाचा अमृत वर्षाव यांची प्राप्ती झाल्याने त्याच्या शाश्वत मुळानी, दिव्य फळांनी लावलेल्या चैतन्य वृक्षाचे रूप घेतले. आणखी नियमबद्ध कार्यक्रमांची तेथे जरुरीच नव्हती. वादळ येऊ दे, सागराला भरती येऊ दे, धरणीकंप होऊ दे, अरुणाचलम्च्या शिखरावरील हा ज्ञानवृक्ष अक्षय उभा आहे.

जीवन यात्रेतील अनेक यात्रेकरू या वृक्षाच्या

*परिस्थिती बदलता येत नाही, बदल स्वत:त करता येतो.*

सावलीत येतात तर अगणित भक्त पक्ष्यांसारखे त्याच्या निरनिराळ्या शाखावर किलबिलाट करीत त्यांच्यावर जणू स्तोत्रांचा वर्षाव करीत असतात. खरोखरच हे आत्मानंदाचे साम्राज्य आाहे.

विद्वतेने तसेच स्वत:च्या काही अनुभवांतून आत्मसाक्षात्कार कधीच साध्य होत नाही, तात्रिकपणे चर्चा करून, सत्याचा शोध घेण्याची कला अवगत असलेल्या विज्ञानापेक्षा आत्मसाक्षात्कारी स्वामींनी केलेले सत्याचे सूक्ष्म स्पष्टीकरण अधिक समजते. कारण, स्वामी हा स्फटिकासारखे स्वच्छ, मनाचे शुद्ध, जाणिवेच्या प्रकाशमय अवस्थेत होते. आणि विज्ञान हे सतेज बुद्धीची मदत असलेल्या अविदयेच्या नृत्यात रंगलेले असते. ज्याना निखालस आत्मसाक्षात्कार झालेला आहे. त्यांचा अहंकार लोप लावतो आणि स्वयंस्फूर्तज्ञान प्राप्त झाल्याने ते स्वत:च ज्ञान स्वरूप असतात. त्याना संपूर्ण विश्व तळहातावर असलेल्या आवळ्याप्रमाणे स्वच्छ दिसते. द्वैतात अद्वैत आणि अद्वैतात द्वैत सामावले आहे हे ज्यांना स्पष्टपणे उमगले, त्याला अगम्य आणि अस्पष्ट असे काय उरणार? जे एकाच दृष्टिक्षेपता सर्व वस्तूचे सार पाहू शकतात त्यांना हृदयापर्यंत जाऊन भिडणाऱ्या दृष्टांताची भावना थोडीच असणार? आत्मसाक्षात्कारी अलौकिक व्यक्तिमत्वापुढे सर्वच नम्र होतात यात काय संदेह?

अशी विभूतिमत्वे भरतभूत नेहमीच जन्म घेतात. आपले नियोजित कार्य आटोपून या जगाचा निरोप घेतात. धन्य ती भारत भू अशा उत्तुंग व्यक्तिमत्वाला जन्माला घालते. म्हणूनच 'दुर्लभं भारते जन्म' असे म्हटले जाते.

**श्री. शं. बा. मठ**
६, कुमार आशिष,
राम मारूती रोड, ठाणे ४०० ६०२

•••

## हे शब्द असे लिहावेत

### स्वकीय

हा शब्द संस्कृत विशेषण आहे. याचा अर्थ आहे स्वत:चा. या शब्दात 'स' ला व जोडून, 'क' ला दुसरी वेलंटी हवी. या शब्दाचे सामान्यरूप करतानाही या मूळ शब्दात फरक पडत नाही. उदा. स्वकीयांचे, स्वकीयांना इ.

### बीज

हा संस्कृत शब्द आहे. मूळ, संतती, द्वितीया इ. या शब्दात 'ब' ला दुसरी वेलांटी द्यावी. या शब्दाचे सामान्यरूप करतानाही या शब्दात बदल करू नये. 'बिजेला' 'बिजेसाठी' असे रूप करू नये.

### नि:संग

हा संस्कृत शब्द आहे. याचा अर्थ आहे विरक्त, लोकरीती सोडलेली. या शब्दात 'न' पुढे विसर्ग हवा. काही वेळा 'नित्संग' असा चुकीचा शब्द लिहिला जातो. तो चुकीचा आहे.

### सहस्त्ररश्मी

'सहस्त्ररश्मी' म्हणजे सूर्य. 'रश्मी' म्हणजे प्रकाश, किरण. सूर्याला स्हस्त्र किरणं असतात म्हणून त्याला सहस्त्ररश्मी म्हणतात. या शब्दात 'स' ला 'र' जोडावा व 'श' ला 'म' जोडावा. 'स' ला 'त्र' जोडण्याची चूक होऊ शकते.

### बुभुक्षित

याचा अर्थ आहे भुकेला, हपापलेला, गरजू इ. हे संस्कृत विशेषण आहे. हा शब्द लिहिताना 'ब', 'भ' ला पहिला उकार व 'क्ष' ला पहिली वेलांटी द्यावी. शब्दाचा उच्चार जर योग्य रीतीने केला, तर ऱ्हस्व, दीर्घ चुकणार नाही.

*मी सत्य सांगतो तो लोकांना विनोद वाटतो, यापेक्षा भयंकर विनोद कोणता? - जार्ज बर्नार्ड शॉ*

# वार्धक्य - शाप की वरदान ?

*उत्पत्ती, स्थिती व लय हा निसर्गाचा नियम आहे. यातील स्थितीची अखेरची अवस्था वार्धक्य. नकोसा वाटणारा हा काळ सुखाचा करता येईल का, या दृष्टीने काही विचार - संपादक*

वार्धक्य कोणाला आवडते? वार्धक्य आवडणारी या जगात एकही व्यक्ती शोधून देखील सापडणार नाही. प्रत्येकाच्या मनामध्ये आपण चिरतरुण रहावे असे वाटते. पण ते शक्य आहे का? कालाय तस्मै नमः। जन्माला आलेल्या प्रत्येक व्यक्तीला कालपरत्वे वार्धक्य आणि अंतिमतः मृत्यू हे अटळ आहे. ते एक त्रिकालबाधित नैसर्गिक सत्य आहे. तरीसुद्धा डोक्यावरील पहिल्या वहिल्या पांढऱ्या केसाने माणूस दचकतो, भयचकित होतो. कोणी 'काका'च्या ऐवजी 'आजोबा' म्हणून हाक मारली, की मनातून खट्टू होतो. पुराणातील ययातीने आपल्या मुलाकडून आपल्या वार्धक्याच्या बदल्यात त्याचे तारुण्य घेतले, तसा प्रयत्न करायला देखील आधुनिक 'ययाती' शक्य असेल तर मागे पुढे पहाणार नाही. 'कायाकल्प' करुन तरुण होण्याची कल्पना ह्याच चिरतरुण रहाण्याच्या स्वप्नातून निर्माण झालेली आहे. विज्ञानाने कितीही प्रगती केली तरी माणूस म्हातारा होणारच नाही, अशी काही संजीवनी माणसाला अद्याप सापडलेली नाही आणि पुढे सापडेल असे वाटत नाही. कारण तसे झाले तर ते निसर्गक्रमाच्या उलट होईल आणि जगाचे रहाटगाडगेच उलटे पालटे होईल.

माणसाला वार्धक्य नकोसे का वाटते? वृद्धापकाळी माणसाच्या शक्ती म्हातारपणी क्षीण होतात. दृष्टी, श्रवण ह्या संवेदना क्षीण होतात. पचनशक्ती कमी होत. भूक कमी लागते. निद्रानाश होतो. रोगप्रतिकारकशक्ती कमी होते. त्यामुळे शरीर म्हणजे अनेक रोगांचे माहेरघर होते. रक्तदाब, मधुमेह, सांधेदुखी इ. व्याधी शरीरामध्या ठाण मांडून बसतात. त्यामुळे वृद्ध व्यक्तीला आपण आजारी पडलो तर आपण परस्वाधीन होऊ, आपली सेवा शुश्रूषा कोण करील, आजारपणामध्ये होणाऱ्या वेदना आणि क्लेश आपल्याला सहन होतील का, ह्याची चिंता वाटते, त्याचा ताण, दडपण सतत त्याच्या मनावर असते.

वृद्ध व्यक्तींची दुसरी समस्या म्हणजे एकटेपणा. मनुष्य हा समाजप्रिय प्राणी आहे. त्याला एकटे रहायला आवडत नाही. तसेच कुटुंबातील किंवा समाजातील व्यक्तींनी आपल्याशी बोलावे असे त्याला वाटत असते. ती त्याची भावनिक गरज असते. ती त्याची मनाची भूक असते. परंतु काही वेळा कुटुंबातील तरुण व्यक्ती आपल्या उद्योग व्यवसायामध्ये, नोकरीच्या व्यापामध्ये इतक्या व्यग्र असतात, त्या कुटुंबातील वृद्ध व्यक्तींशी पुरेसा संवाद साधत नाहीत. कामापुरतेल मोजकेच, जुजबी बोलतात. वास्तविक आपल्या व्यक्तीसाठी, प्रेमाच्या गप्पागोष्टी करण्यासाठी थोडा बहुत वेळ काढणे ही काही फार कठीण गोष्ट नाही. परंतु तीव्र इच्छेच्या अभावी, कळत - नकळत तसे घडत नाही. शिवाय 'जनरेशन गॅप' मुळे, प्रत्येकाचे आवडीचे विषय वेगळे असतात. त्यामुळे वृद्ध व्यक्ती समवयस्करांशी तसा संवाद साधू शकतात, तसा घरातील तरुण मंडळीशी, लहान मुलांशी संवाद साधू शकत नाहीत. त्यामुळे शेजारी पाजारी समवयस्क वृद्ध व्यक्ती नसतील, तर त्यांना एकटेपणाची भावना सतावू लागते. आपल्या भावना व्यक्त करायला, त्या समजून घेईल अशी व्यक्ती नसेल, तर त्यांच्या भावनांचा निचरा होत नाही. विशेषतः वृद्ध व्यक्ती ही एकटी असेल, विधुर किंवा विधवा, तर तिच्या एकटेपणाचे दुःख फारच तीव्र असते.

हे सर्व जरी खरे असले, तरी आपण वार्धक्य हा 'शाप' मानायचा का? वार्धक्याकडे आपण 'वरदान' ह्या दृष्टीने का पाहू नये ? परमेश्वराने आपल्याला दीर्घायुष्य दिले त्यामागे त्याचा काही तरी हेतू निश्चित असला पाहिजे. वृद्धत्वाचे प्रयोजन काय ? ते आपल्या आर्य संस्कृतीने, प्राचीन हिंदू परंपरेने आधीच सांगितलेले आहे. त्याप्रमाणे जीवनाचे ब्रह्मचर्याश्रम, गृहस्थाश्रम, वानप्रस्थाश्रम आणि संन्यासाश्रम असे चार भाग केलेले आहेत. ह्याचाच अर्थ असा म्हातारपण म्हणजे वानप्रस्थाश्रम आणि संन्यासाश्रम ह्या दोन आश्रमांचा कालखंड असतो. संसारातून लक्ष काढून घेऊन अलिप्त होऊन, समाजासाठी आपले जीवन व्यतीत करावे हा त्या मागे हेतू आहे. प्रापंचिक जबाबदारी मुलावर सोपवून समाजातील दु:खांचे निवारण करण्यासाठी आपली शक्ती, वेळ आणि जीवन द्यावे हे अपेक्षित आहे.

सध्याच्या काळात पूर्वीप्रमाणे अगदी वानप्रस्थाश्रम स्वीकारुन जंगलात जाऊन रहाण्याची गरज नाही किंवा संन्यास घेऊन भगवी वस्त्रे परिधान करून गावोगाव भटकण्याची गरज नाही. आपल्या घरीच राहून, समाजामध्येच राहून कितीतरी गोष्टी वृद्ध व्यक्ती करू शकतात. घरातील लहान मुलांचा अभ्यास घेणे, स्वयंपाकघरामध्ये घरातील गृहिणीला किरकोळ कामांमध्ये मदत करणेल विजेचे बिल, टेलिफोन बिल इ. बिले भरणे, घरातील कर्त्या पुरुष्याला सल्ला देणे, अडीअडचणीच्या वेळी मार्गदर्शन करणे, आपल्या अनुभवाचा त्याला लाभ देणे इ. कितीतरी गोष्टी वृद्ध व्यक्ती करु शकतात. 'सामाजिक बांधिलकी' च्या जाणिवेतून समाजातील गरीब, गरजू, परंतु होतकरु मुलांना शिकविणे, वृद्धाश्रम, अनाथाश्रम, वाचनालय इ. ठिकाणी विनामोबदला किंवा अल्पवेतन घेऊन काम करणे. अशा किती तरी गोष्टी करणे शक्य आहे. जेणे करुन आपल्या जीवनाचा काही उपयोग नाही अशी खंत मनाला सतावणार नाही. उलट आपणही समाजाच्या उपयोगी पडू शकतो, ही भावना मनाला उभारी देईल. सगळ्याच गोष्टी समाजासाठी केल्या पाहिजेत, स्वत:साठी काही गोष्टी केल्यातर ते पाप ठरेल, असे समजण्याचे मुळीच कारण नाही. तरुणपणी प्रपंचाच्या धबडग्यात, संसाराच्या रगाड्यात काही गोष्टी करणे इच्छा असून देखील आपल्याला शक्य होत नाही. त्या आता आपण म्हातारपणी करू शकतो. कारण आता आपल्याकडे मोकळा वेळ भरपूर असतो. एरवी ज्या धंदाकडे लक्ष देण्यासाठी आपल्याला पुरेसा वेळ नसतो, ते छंद आता आपण जोपासू शकतो. वाचन, लेखन, कला, क्रीडा,छंद इ. गोष्टी आपण करू शकतो. मात्र ह्या गोष्टी करत असताना आपल्याला काम झेपेल हे पहाणे आवश्यक आहे. आपल्या आवाक्याबाहेरील, आपल्या शक्तीपलीकडच्या गोष्टी करणे, आपल्या दृष्टीने मुळीच हितावह नाही. काही जण म्हातारपणी चारधाम यात्रा, तीर्थयात्रा वगैरे करतात ते ह्या दृष्टीने चुकीचे आहे. ह्या गोष्टी तरुणपणीच करायला हव्यात. समाजोपयोगी गोष्टी करण्यासाठी प्रकृतीने साथ देणे, आपले आरोग्य चांगले असणे हे अतिशय महत्वाचे आहे. नियमित आहार, निद्रा, व्यायाम इ. गोष्टींच्या सहाय्याने आपण आपले शरीर तंदुरुस्त राखू शकतो आणि मग आपले वार्धक्य हे आपल्याला, तसेच समाजातील इतर व्यक्तींनाही 'शाप' न वाटता 'वरदानच' वाटेल आणि त्या जगतदात्याने आपल्याला दीर्घायुष्य, वार्धक्य दिल्याबद्दल आपण त्याचे शतश: ऋणी राहू, असे मला वाटते.

**श्री. प्र.द. अरदकर**
६०४, ऋतुपार्क,
ठाणे(प.) ४००६०१
सहशिक्षक- श्रीरंग विद्यालय, ठाणे

•••

# भारतीय तत्त्वज्ञानाची वैशिष्ट्ये

*भारताने तत्त्वज्ञानाची असंख्य वैशिष्टये आहेत त्यातील काही वैशिष्ट्यांचा निर्देश या लेखात येतो - संपादक*

भारताने अगदी प्राचीन काळापासून म्हणजे वैदिक युगापासून मनुष्य प्राणी कुठून आला आणि या पृथ्वीवरील त्याची जीवीन यात्रा संपल्यानंतर तो कुठे जाणार, किंवा जातो; या गंभीर प्रश्नांची चर्चा केली. इतकेच नव्हे तर तात्त्विक चर्चेवरच न थांबता अनुभवाच्या जोरावर या प्रश्नांची उत्तरे शोधण्याचा प्रयत्न केला. या दृष्टीने 'तत्त्वज्ञान' या शब्दापेक्षा 'दर्शन' हा शब्द वापरणे तर्कसंगत. कठोपनिषदातल्या नचिकेत आणि यम यांची कथा या दृष्टीने उद्‌बोधक आहे. त्याच्या काळात यज्ञ हा पुण्य प्राप्तीचा उपाय होता. परंतु नचिकेताने आपल्या वडिलांना यज्ञात भाकड गाई ब्राह्मणांना दान देत आहे हे पाहिले आणि त्याच्या मनात अशा दानाच्या औचित्याबद्दल प्रश्न निर्माण झाला व त्यांने वडिलांना प्रश्न विचारला. यज्ञ क्रियेच्या गडबडीत वडिलांनी त्याच्याकडे लक्ष दिले नाही. म्हणून त्याच्यावर तोच प्रश्न पुन्हां पुन्हां विचारण्याची पाळी आली. 'तुम्ही मला कोणाला देऊन टाकणार' हा प्रश्न तर दानाच्या क्रियेसंबंधी प्रश्नचिन्ह निर्माण करणारा, म्हणजे व्यावहारिक अर्थात अडचणीचा ठरावा हे स्वाभाविक होते. वडिलांनी रागाने 'मी तुला यमाला देऊन टाकण्याचे ठरवले' असे उत्तर दिले. ही आज्ञा प्रमाण मानून नचिकेत सरळ यमाकडे म्हणजेच मृत्यू देवतेकडे जाऊन पोचला. त्यावेळी यम घरी नसल्यामुळे नचिकेताला तीन रात्री तेथेच काढाव्या लागल्या. यम परतल्यानंतर त्याला नचिकेतासम्बन्धी कळल्यानंतर स्वाभाविकपणे त्याच्या प्रश्नांबद्दलचे आश्चर्य व प्रश्नाचे उत्तर प्राप्त करण्यासाठी त्याने दाखवलेली निरनिशय आस्था याबद्दल आश्चर्य वाटले. हा प्रश्न वस्तुतः या मूलभूत तत्त्वाला हात घालणारा होता. म्हणून यमाने त्याचे उत्तर टाळण्यासाठी नचिकेताला व्यावहारिक ऐश्वर्य प्राप्त करून देणारी अनेक प्रलोभने दाखवली. परंतु नचिकेताने सर्वांचा त्याला लोभ नाही हे स्पष्ट करून आपल्या प्रश्नाचे उत्तर मिळवण्याचा दृढ निर्धार व्यक्त केला. याचे यमाने दिलेले उत्तर मनुष्याच्या मूलभूत देवत्वाचे, सान्त व्यक्तीने केलेल्या अनन्ताच्या अन्वेषणाचे द्योतक आहे. अनन्ताच्या अन्वेषणानंतर तो अनन्ताशी म्हणजे सम्पूर्ण विश्वाशीच एकरूप होऊन जातो, असा या उत्तराचा आशय आहे. यातला कथेचा भाग सोडून दिला तर, मर्यादित मानवाने अमर्यादाची आकांक्षा धरून त्यात विलान होण्याची जी अभिलाषा बाळगली त्यालाच हे रुप प्राप्त झाले.

परन्तु हा मार्ग नचिकेतासारखे काही अपवादभूत व्यक्तीच पत्करतात याला यमाने श्रेयोमार्ग अशी संज्ञा दिली. कारण यात मानवाचे अन्तिम कल्याण आहे. याची बहुसंख्य व्यक्तींना जाणीव नसते. ते यापेक्षा निराळा म्हणजे केवळ भौतिक सुख-समृद्धींनी समन्वित असलेला मार्ग म्हणजेच प्रेयोमार्गच रत करतात. शॉ सारख्या विचारवंताच्या शब्दांत हा Path of vice असल्यामुळे यात माणसाला गुंगवून ठेवण्याची शक्ती असते. यात अडकल्यानंतर तरा ओलांडून पुढे जाणे शक्य होत नाही. योगक्षेम या मार्गावरून वाटचाल करणाऱ्यांना सुलभ वाटतो आणि तसा तो असतोही या सुलभतेतच सिद्धी प्राप्त होतात परन्तु या तातपूरत्या म्हणजे क्षणभंगूर असतात. हा क्षणिक वैभवाचा काळ संपला की पुन्हा 'पुनरपि जनन पुनरपि मरणम्' अटळ होऊन बसते. म्हणूनच कठोपनिषदात हा मार्ग स्वीकारणाऱ्यांना उद्देशून 'मन्द' म्हणजे मन्दबुद्धी असे म्हटले.

---

*कायदा पाळा गतीचा, थांबला तो संपला. - माधव ज्यूविय*

नचिकेताने निवडलेला मार्ग हा श्रेयोमार्ग त्याच्या तरुण वयात यमाने पुढे केलेल्या प्रलोभनांचा 'तवैव वाहा: तयैव नृत्यगीते' म्हणजे घोडे, नृत्ये आणि गीते तुझ्या जवळच राहू दे मला 'मनुष्य मृत्यूनंतर कुठे जातो' याचेच उत्तर हवे आहे. असे ठमपणाने म्हटल्यामुळे त्याची गणना 'धीर' व्यक्तीत यमाने केली आणि अशा व्यक्ती आवडणाऱ्या म्हणजे काही काळापुरत्या आनंद देणाऱ्या वस्तूंचा त्याग करून टिकणारे म्हणजे स्थायी समाधान देणाऱ्या मार्गावर जाणे पसन्त करतात. या मार्गावर पावले टकणाऱ्यांना अर्थ आणि काम यांच्या मागे लागणाऱ्यांचे समाधान क्षणिक असते याची ओळख पुटते आणि ते धर्ममार्गाचा अवलंब करणेच हिताचे हा निर्णय अंमलात आणतात.

धर्ममार्गाचा स्वीकारणाऱ्यांना अर्थ आणि काम यांचे वावडे नसते आणि नसावे कारण त्यांचा तिरस्कार करण्यापेक्षा त्यांना हिणकस मानून सहहेतुकपणाने त्यांच्या पलीकडे जाणे आवश्यक मानलेले असते. भारतीय संस्कृतीत अर्थ आणि काम यांना 'पुरुषार्थ' ही संज्ञा दिली हे विसरून चालणार नाही. परन्तु महाभारत कार व्यासांनी हे पुरुषार्थ धर्माच्या सहाय्यानेच मिळवावे, 'धर्मादर्थश्च कामश्च' यावर भर दिला. हे लक्षात ठेवले पाहिजे. अर्थ आणि काम यांच्या आराधनाने आनंद मिळतो हे मोकळेपणाने मान्य करून त्यांच्या हितावहते बद्दलच भारतीय तत्त्ववेत्त्यानी आक्षेप घेतला. जे चांगले व सोयीचे वाटते ते परिणामी हितावह ठरत नाही एवढेच त्यांचे म्हणणे.

सुख आणि दु:ख यामधून सुखाची निवड प्रत्येक व्यक्ती करत असते. प्रश्न सुखांच्या विवेकाचा आहे. हा प्रश्न पाश्चात्य विचारवंतानी आपल्या चर्चेचा विषय करावा यात नवल नाही. किंबहुना भौतिक साधनांनी संपन्न असलेल्या आजच्या जगात क्षणिक सुख आणि स्थायी सुख यांत निवड करणे कठिण होऊन बसलेले आहे. ऐहिक गरजा पुरविण्यासाठी नवीनवी साधने गोळा करण्यात आधउनिक मानव जास्त जास्त गुंतत चाललेला आहे आणि त्यांत मनुष्य स्वत:च त्या साधनांचा गुलाम होण्याचा धोका वाढत चालला. हे अमान्य करण्यात अर्थ नाही. ऐश्वर्य प्राप्त करून घेणे हे योग्यच आाहे परन्तु त्यातच सदैव गुंतुन रहाणे चांगले नाही. ऐश्वर्याचा ऱ्हास होण्याचे संकट आधुनिक काळात वाढलेले आहे. मनुस्मृतीने जुन्या काळात

'न जातु काम: कामानु पभोगेन शाम्यति।

हविषा कृरणवर्त्येव भूय भूय एवाभि वर्धन्ने।।

असे लिहून हा धोका सांगितला होता. विज्ञान व तंत्रज्ञान यांच्या आधुनिक विकासात मनुष्याला हे भय तीव्रतेने जाणवू लागलेले आहे. त्याच्या जीवनाची गुणवत्ता कायम ठेवण्यासाठी विज्ञानाबरोबरच धार्मिक संतुलन निर्माण करण्याची गरज आहे. म्हणून श्री. एस्. आर. भट्ट आपल्या एका पुस्तकात लिहितात :-

" The trditional concept of purushkrtha along with its true faceld model of dharma, artha, kama and molesa in one of the frominent formulations of this uncern of quality of life".

भौतिक समृद्धीची आध्यात्मिक प्रगतीशी सांगड घालण्यात जर आम्ही यशस्वी होऊ शकलो नाही तर आमचे जीवन 'will be a tale of full of sound and fury signifying nothing' होण्याचे संकट अटळ आहे.

धर्म या शब्दाचे religion असे भाषांतर करून धर्माला आधुनिक काळात फार संकुचित रूप दिले गेले हे मान्य केले पाहिजे. धर्म याचा मूळ अर्थ कर्तव्य असा आहे आणि यापासून वस्तुत: कोणालाच सुटका नाही. प्रत्येकाने आपल्या वाटेला आलेले कर्तव्य नेकीने करीत रहाणे म्हणजेच समाजात सुसंवाद निर्माण करणे आहे. ज्ञान संपादन करणे आणि त्याचे वितरण करणे, दैवी आपत्तींबरोबर मानवाने अविवेकाने निर्माण केलेल्या विषमतेने ग्रस्त झालेल्यांचे रक्षण करणे, आयुष्याला उपयोगी असणाऱ्या

वस्तूंची व उपयोगांची वाढ करून समाजाला आर्थिक सुस्थिरता आणून देणे आणि ही कामे करणाऱ्यांची सेवा करणे या सर्वांचीच आवश्यकता असते. कार्यांची अशी विभागाणी म्हणजेच ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य आरि शूद्र हे चार वर्ग एकमेकांशी सलोख्याने ज्या समाजात नांदतात नव्हे वर्धिष्णु असताता तो समाज आपली प्रगती करण्यात सक्षम ठरतो. हे सहज समजण्यासारखे आहे. यांत श्रेष्ठ आणि कनिष्ठ हा भेद जन्माच्या आधारावर न करता कर्माच्या, कौशल्याच्या पार्श्वभूमीवर करायला हवा. पुरुषसूक्तात समाजपुरूषाच्या मुख, वाह, मांड्या आणि हातपाय या अवयवांचा जो निर्देश केलेला आढळतो, तो मूलत: या पुरुषाच्या सर्वांगीण प्रगतीचा द्योतक होता. यात प्रत्येक वर्गाच्या उत्कर्षाचा विचार अनस्यूत आहे. या श्रेष्ठ कनिष्ठतेची वर्गवारी लावल्यामुळे वैदिक युगानंतरची प्रगती मध्यकाळात खुंटली आणि वर्णांतून हळूहळू जाती निर्माण झाल्या. यांच्यामधला सलोखा उत्तरोत्तर कमी होत गेला. त्याची कडू फळे आम्ही भोगीत आहोत, हे उघड आहे. मूळ तत्त्वापासून व्यवहार अधिकाधिक दूर म्हणजे संकीर्ण होत गेल्यामुळे आमच्या जयिष्णु तत्त्वज्ञानाला पराभवाचे वळण लागले. यात बदल करणे सोपे नाही हे खरें परन्तु वैज्ञानिक आणि बुद्धिप्रधान युगात हे अत्यावश्यक आहे. यासाठी वैदिकांच्या

समानीवा कति: समाना हदयानिव;

समानमस्तु वो मनो यथाव: सुसहासति।

या प्रार्थनेचा पुनरुच्चार महत्वाचा ठरतो

**डॉ. मो.दि. पराडकर**
माहिम, मुंबई ४०० ०१९

•••

## *हे शब्द असे लिहावेत*

### स्फुट

हे संस्कृत विशेषण आहे. याचा अर्थ विकसित, उघड, स्पष्ट, किरकोळ इ. या शब्दांत 'स' ला 'फ' जोडावा व त्याला पहिला उकार द्यावा. 'स्फूट', 'स्फूठ', 'स्पुट' असे लिहू नये.

### मत्स्यावतार

विष्णूने घेतलेल्या दहा अवतारांपैकी मत्स्यावतार हा पहिला अवतार आहे. मत्स्य म्हणजे मासा. या शब्दात 'त', 'स' व 'य' जोडूनच लिहावे लागतात. मत्स्यावतार, असे लिहू नये.

### फूत्कार

या शब्दाचा अर्थ आहे रागाचा आवेशयुक्त सुस्कारा. हा संस्कृत शब्द आहे. या शब्दात 'फ' ला दुसरा उकार आहे व अर्धा त 'क' ला जोडावा. 'फुत्कार', 'फुतकार' असे लिहू नये.

### बुभु:कार

वानराच्या ओरडण्याला बुभु:कार म्हणतात. या शब्दात 'ब' ला व 'भ' ला पहिला उकार व या अक्षरापुढे विसर्ग द्यावा. 'बुभुक्कार', 'बूभुक्कार' असे लिहिणे चुकीचे आहे.

### लखलखीत

'ईत' हा मराठी प्रत्यय लागून विशेषण तयार होते. यापासून तयार झालेले शब्द दीर्घ असतात. म्हणून 'लखलखीत' हा शब्दही दीर्घ असावा. 'चकचकीत' हेदेखील याच प्रकारचे उदाहरण आहे.

पुस्तक परिचय

# समर्थ साहित्यासंदर्भातील लक्षणीय पुस्तक

*या महिन्यातील दास नवमी निमित्ताने हा परिचय लेख आहे - संपादक*

मराठी संत साहित्यातील ग्रंथ असे आहेत की त्यांच्या अभ्यासाच्या दिशा आणि शक्यता अक्षरश: अगणित आहेत. श्री ज्ञानेश्वरी, एकनाथी भागवत, नामदेव गाथा -- कोणताही ग्रंथ घ्या अशा संस्कारक्षम ग्रंथांचा आजवर अनेकांनी अन्वयार्थ लावला. त्यावर भाष्ये केली, तरीही व्यक्तिगणिक वेगवेगळा अभ्यास संभवू शकतो असे हे साहित्य समृद्ध आहे.

श्री समर्थ रामदास स्वामींच्या साहित्याचे ज्येष्ठ अभ्यासक, हनुमान भक्त श्री. श्रीधर हरी परांजपे यांचे समर्थ वाङमय मनोवेधक आस्वाद हे पुस्तक वाचताना वरील निरीक्षणाची सत्यता पटते. श्री. हरिभाऊ परांजपे यांनी मनाचे श्लोक मनोवेधक मनन चिंतन हा अतिशय संग्राह्य व अभ्यासपूर्ण ग्रंथ लिहून समर्थविषयक साहित्यात महत्वपूणे भर टाकली आहेच. आता या पुस्तकाच्या रूपाने आपले समर्थचिंतन शब्दांकित करण्याचा पुढचा टप्पा त्यांनी गाठला आहे.

रामदास स्वामींचे साहित्य बहुविध स्वरूपाचे आहे. मनाचे श्लोक आणि दासबोध या अजरामर रचनांचा जनमानसावर खोलवर परिणाम आहे. स्वाभाविकच याबद्दल जनमानसाला असणारी ओढ समजण्यासारखी आहे.

या पुस्तकात श्री. परांजपे यांनी दासबोधसह काही साहित्य भाष्यासाठी घेतले आहे. यातील २१ लेखांपैकी १७ लेख दैनिक महाराष्ट्र टाईम्सच्या सगुण निर्गुण या सदरासाठी त्यांनी लिहिले आहेत. त्याबरोबर या पुस्तकात त्यांनी तीन पद्य रचनाही समाविष्ट केल्या आहेत.

रामदासांच्या साहित्याचे ठळक वैशिष्ट्य म्हणजे वैचारिकता आणि त्या विचारांतील अंतर्मुख करणारे आंतरिक सौदर्य. या विचारंचा वेध घ्यायचा, त्यांचा जाणवलेला भाग शब्दांकित करावयाचा हा एक आनंद आहे. हा वेध घेताना परांजपे यांच्या शैलीत असणारी प्रासादिकता लेखांची वाचनीयता वाढवते. दासबोधाची विचारधारा, संसाराचे रहस्य, दगड व माणसातील साम्यभेद, भगवंताचे अधिष्ठान या विषयांबरोबरच श्रीरामाचे नामस्मरण (पृ.४०) अमर शिवथरघळ(पृ.४३) हे व असे लेख मन समृद्ध करतात. पुस्तकाला प्रस्तावना लिहिताना. परांजपेंचे विद्यार्थी प्रसिद्ध गीतकार प्रा. प्रवीण दवणे अचूकपणे लिहितात, 'समर्थ वाङमय विपुल आहे आणि त्यातील प्रत्येक (हा शब्द महत्त्वाचा) विचारावर सटीप लिहिणे हा अनेक जन्मांचा वसा आहे.' हे खरेच आहे. ग्रंथपालाच्या दृष्टीमुळे या विवेचनातून व्यक्त होणारा व्यासंग हा मनोज्ञ आहे.

जीवनावर रूसू नये. सुशिक्षित व्हावे. संगीतादी छंद वाढवावेत. खूप पाठांतर करावे. संसार नासू देऊ नये. (पृ.१२) समर्थांमध्ये पंचमहाभूतांतील सूक्ष्म व विराट सगुण-निर्गुण स्वरूप दाखवण्याची अफाट प्रतिभाशक्ती आहे. (पृ. ५७) मनाचे श्लोक हा समर्थांनी दिलेला परीस आहे. ही नॅनो टेक्नॉलॉजी आहे. अशी कितीतरी अवतरणे देण्याचा मोह होतो. तो मुळातून ससंदर्भ वाचणे समजावून घेणे गरजेचे आहे. विशेषत: मनाचे श्लोक आणि नॅनो टेक्नॉलॉजीची कल्पना फार महत्वाची आहे.

पृ.७० ते ७२ या दरम्यान दिलेल्या पद्य रचना (एक इंग्रजी) देखील समजावून घेण्यासारख्या आहेत.

परंतु परांजपें सारख्या समर्थ साहित्याच्या व्यासंगी अभ्यासकाला वृत्तपत्रीय सदराची २५० शब्दांची मर्यादा घालणे म्हणजे विचारांच्या अभिव्यक्तीला, धबधब्याला बंदिस्त करण्यासारखे आहे. याच छोट्या पुस्तकांतील प्रत्येक विचारावर स्वतंत्र ग्रंथ लिहिणे हे परांजपे यांना शक्य आहे. भगवंताने त्यांच्या हातून हे घडवावे असे पुस्तक वाचल्यावर वाटत राहते.

**समर्थ वाङमय: मनोवेधक आस्वाद**
**लेखक - परांजपे ह.श्री. ठाणे,**
ह.श्री. परांजपे २००७ पृष्ठे ७२ मूल्य रू. १००

**परिचय - प्रा. मोहन पाठक,**
ठाणे.

# परिसरवार्ता

## डॉ. बेडेकर विद्या मंदिर

**माध्यमिक विभाग**

- 'मुंबई चिल्ड्रन ॲकॅडमी' तर्फे ०८ जाने. रोजी इ. ५ वी ते ९ वी च्या विद्यार्थ्यांना 'पृथ्वीचे मनोगत' हा माहितीपट दाखविण्यात आला.
- महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी ठाणे विभाग यांच्यातर्फे ७ वी ते ९ वी च्या विद्यार्थ्यांसाठी १० जाने. रोजी आयोजित निबंध स्पर्धेत सर्व विद्यार्थी सहभागी झाले.
- १३ जाने. रोजी ८ वी व ९ वी च्या विद्यार्थ्यांसाठी 'म्यूरल कार्यशाळेचे' आयोजन केले गेले. सदर कार्यशाळा नि:शुल्क होती.
- रामकृष्ण मठ, मुंबई या संस्थेतर्फे 'विवेकानंद जयंती' निमित्त आयोजित वक्तृत्व स्पर्धेत कु. प्रणिता काळभोर (५ अ) हिने ठाणे शहर आणि मुंबई विभागात ''विशेष प्रावीण्य'' मिळविले.
- स्काऊट गाईड विभागातर्फे ''खरी कमाई महोत्सवानिमित्त १५ जाने. मकर संक्रांतीच्या दिवशी ''आनंद मेळाव्याचे'' आयोजन केले गेले. स्टॉल्सना विद्यार्थ्यांनी भरघोस प्रतिसाद दिला.
- गणेश चिल्ड्रन फिल्मस् तर्फे इ. ५ वी ते ७ वी च्या विद्यार्थ्यांना ''साकार'' हा चित्रपट दाखविण्यात आला.
- जिज्ञासा ट्रस्ट, ठाणे तर्फे घेण्यात आलेल्या 'ठाणे जिल्हा आंतरशालेय प्रश्नमंजूषा' स्पर्धेत

  १) अरूणकर शौनक ८ ब

  २) मेस्त्री अभिलाषा ८ ब

  ३) इनामदार अद्वैत ९ अ

  ४) देवकर मयूर ९ अ

  या विद्यार्थ्यांनी 'अ' श्रेणी मिळविली.
- १८५७ च्या उठावाला यंदा १५० वर्षे पूर्ण झाली. त्या निमित्ताने अर्थ फांऊडेशनतर्फे आयोजित 'क्रांतिकारकांची चित्रे पाहून नावे ओळखणे' या स्पर्धेत ७ वी ते ९ वी तील सर्व विद्यार्थी सहभागी झाले.
- इनरव्हिल चॅरिटी ट्रस्ट, ठाणे तर्फे आयोजित 'पुष्परचना व रंगावली' स्पर्धेत कु. मृण्मयी कोळी (८ अ) हिस अनुक्रमे प्रथम व उत्तेजनार्थ पारितोषिक मिळाले.
- श्री मां बालनिकेतन येथे झालेल्या आंतरशालेय 'पुष्परचना' स्पर्धेत मृण्मयी कोळी (८ अ) हिला प्रथम पारितोषिक (प्रमाणपत्र व गोल्डमेडल) मिळाले.
- स्वामी श्री. प्रेमपुरीची आश्रम ट्रस्ट मुंबई येथे आंतरशालेय सांघिक 'पुष्परचना' स्पर्धेत कु. गौरी बोरवणकर (६ ब) व मृण्मयी कोळी (८ अ) यांना प्रथम पारितोषिक व शाळेला ट्रॉफी मिळाली.
- पिडिलाईट तर्फे गुरुवार दि. ३१ जाने. रोजी हॉटेल 'ट्विन्स' ठाणे पूर्व येथे आयोजित कला कार्यशाळेस शाळेतील कला शिक्षक उपस्थित होते.
- भारत सरकारच्या विज्ञान आणि तंत्रज्ञान विभागातर्फे सन ०८ हे 'वसुंधरा वर्ष' म्हणून साजरे होत आहे.

या उपक्रमांतर्गत जिज्ञासा ट्रस्टच्या वतीने ३० जाने. हुतात्मा दिनी, उपवन तलाव येथे 'श्रम संस्कार शिबिर व प्रभात फेरी' तसेच, 'घोषवाक्य स्पर्धेचे' आयोजन केले गेले. सदर स्पर्धेत कु. स्नेहल भोळे (७ ब) व ओंकार सावंत (७ ब) यांच्या घोषवाक्यास पारितोषिक मिळाले.

- फेब्रुवारी महिन्याच्या २ ऱ्या व ३ ऱ्या शनिवारी सह्याद्री वाहिनीवर 'हा खेळ शब्दांचा' हा कार्यक्रम रात्री ९.०० वाजता प्रदर्शित केला जाणार आहे. कार्यक्रमात शाळेचे काही विद्यार्थी सहभागी झाले आहेत.
- १२ जाने. विवेकानंद जयंती निमित्त धनंजय कीर पुरस्कार विजेते शाळेचे माजी विद्यार्थी प्रा. श्री. प्रदीप ढवळ यांच्या 'नरेंद्र ते विवेकानंद एक झंझावात' या पुस्तकाच्या द्वितीय आवृत्तीचे प्रकाशन, मा. मुख्याध्यापिका सौ. कळमकर यांच्या हस्ते विद्यालंकार हॉलमध्ये करण्यात आले.
- रविवार ३ जाने. रोजी झालेल्या मराठा मंदिर महाराष्ट्र ज्ञानपीठ मुंबई तर्फे घेण्यात येण्याऱ्या मराठी शिष्यवृत्ती सराव परीक्षेत इयत्ता ७ वी चे ५७ विद्यार्थी सहभागी झाले.

## सौ.आनंदीबाई जोशी इंग्रजी माध्यम शाळा

- NIE वर्तमानपत्राकडून खालील मुलांना चषक मिळाले -

| | | | |
|---|---|---|---|
| आदर्श विद्यार्थी परितोषिक | - | वृषाली प्रसादे | ८ वी अ |
| शाळेतर उपक्रमांसाठी | - | मधुरा जोशी | ८ वी ब |
| क्रीडा पारितोषिके | - | ऐश्वर्या ओक | ८ वी ब |
| | | संकेत यादव | १० वी अ |

- **संस्कृती कलादर्पण -**

<u>भेटकार्ड स्पर्धा : अ) गट - ५/६ :</u>

कोमल मुनानकर - द्वितीय

ऋतुजा धनावडे - उत्तेजनार्थ

सानिका नवरे - उत्तेजनार्थ

अनघा करमकर - उत्तेजनार्थ

<u>ब) गट - ७/८ :</u>

दिशा सत्रा - द्वितीय

<u>निबंध स्पर्धा :</u>

ऋतुजा धनावडे - उत्तेजनार्थ

सानिका नवरे - उत्तेजनाथ

<u>चित्रकला स्पर्धा : अ) गट ५/६ :</u>

ऐश्वर्या बापरडेकर - उत्तेजनार्थ

सानिका नवरे - उत्तेजनार्थ

<u>ब) गट - ७/८ :</u>

दिशा सत्रा - उत्तेजनार्थ

<u>क) गट - ७/८ :</u>

तेजल प्रधान - उत्तेजनार्थ

- **हिंदी राष्ट्रभाषा परीक्षा २००७-२००८:**

| इ. | परीक्षेचे नाव | उपस्थित विद्यार्थी | निकाल प्रथम श्रेणी | द्वितीय श्रेणी | तृतीय श्रेणी |
|---|---|---|---|---|---|
| ५वी | बालबोधिनी | ११ | ०७ | ०३ | ०१ |
| ६वी | प्राथमिक | ०३ | ०१ | ०२ | |
| ७वी | प्रवेशिका | ११ | ०७ | ०२ | ०१ |
| ८वी | सुबोध | ०१ | | | ०१ |
| ९वी | प्रबोध | ०१ | | | ०१ |

सर्वाधिक गुण मिळवणारे विद्यार्थी :

इ. ५वी - आकांक्षा पाटील

इ. ६ वी - सानिका मोरे

इ. ७ वी - अक्षता मोहरीर

**✦ 'नाट्याभिमानी' आयोजित एकपात्री नाट्यप्रवेश स्पर्धेचा निकाल -**

'नाट्याभिमानी' ह्या संस्थेने कै. शशी जोशी स्मृती निमित्त एकपात्री नाट्यप्रवेश स्पर्धा आयोजित केली होती.

१) त्यात मधुरा जोशी या विद्यार्थिनीला प्रथम पारितोषिक गट ब मध्ये (इ. ८ वी ते १० वी) मिळाले व प्रेक्षक पसंतीचे पारितोषिकसुद्धा मिळाले.

२) मधुरा गोडबोले या विद्यार्थीनीला गट अ मध्ये (इ. ५ वी ते ७ वी) तृतीय पारितोषिक मिळाले.

## बा. ना. बांदोडकर विज्ञान महाविद्यालय :

महाविद्यालयाचे वार्षिक स्नेहसंमलेन ''आकांक्षा'' ची सुरुवात दि. १८ डिसेंबर रोजी मेंदी, नववधू मेकअप, केशभूषा या स्पर्धांनी झाली. १९ डिसेंबरला सकाळी फुले सजावट, रांगोळी, सॅलॅड मेकिंग अशा विविध कलात्मक स्पर्धा झाल्या. त्यानंतर मिस्टर व मिस बांदोडकर ही स्पर्धा घेण्यात आली. कुणाल भोसले व निवेदिता बेंद्रे यांना मिस्टर बांदोडकर व मिस बांदोडकर या किताबाने गौरवण्यात आले.

एकपात्री अभिनय व मिमिक्री स्पर्धेत झैबा चौगुले हिला प्रथम पारितोषिक मिळाले. सोलो नृत्य, ग्रुप नृत्य, ड्युएट नृत्य या स्पर्धामध्ये प्राची आंबावणे, सचिन व अक्षय आणि ब्लॅकलिस्ट ग्रुपला प्रथम पारितोषिक मिळाले.

२० डिसेंबरला वादन, गायन व अंताक्षरी स्पर्धा तसेच फॅशन शो आयाजित करण्यात आला होता. इनस्ट्रुमेंटल मध्ये दुर्गेश पितळे याला प्रथम पारितोषिक, शलाका कजरेकर हिला द्वितीय पारितोषिक मिळाले. गायन स्पर्धेत निवेदिता बेंद्रे व गौरी लोटे यांना प्रथम पारितोषिक मिळाले. फॅशन शो मध्ये फोनिक्स ग्रुपला प्रथम पारितोषिक मिळाले.

विज्ञान महाविद्यालयाच्या महिला गट व रोटरी क्लब यांच्या संयुक्त विद्यमाने १२ डिसेंबर रोजी एडस् जनजागृती कार्यक्रम घेण्यात आला. राजीव गांधी वैद्यकीय रुग्णालयातील डॉक्टर्स हे विद्यार्थ्यांच्या समस्यांना उत्तरे देण्यासाठी उपस्थित होते. एडस् विषयाशी निगडित एक छोटी फिल्मदेखील दाखवण्यात आली. या कार्यक्रमाला जवळपास १०० विद्यार्थी उपस्थित होते.

महाविद्यालयाच्या वनस्पती विभागातील डॉ. जमदाडे हे Bionanofrontier या वैज्ञानिक नियतकालिकाचे सहसंपादक म्हणून काम पहात आहेत.

महाविद्यालयाच्या ग्रंथपाल कु. कादंबरी कारदेकर या UGC NET ही परीक्षा उत्तीर्ण झाल्या, त्यांचे अभिनंदन!

वनस्पती विभागातील प्रयोगशाळा परिचर श्री. राकेश बने यांनी अर्थशास्त्र या विषयात पदवी शिक्षण पूर्ण केले.

भौतिकशास्त्र विभागातील प्रयोगशाळा परिचर श्री. अविनाश बुरंगे यांनी MS-CIT हा अभ्यासक्रम पूर्ण केला.

## वि.प्र.मं. चे तंत्रनिकेतन

**'Latest Trends in Nano Technology' राष्ट्रीय परिषद :**

जगात नव्याने उदयास येत असलेल्या व सर्वत्र चर्चा होत असलेल्या Nano या तंत्रज्ञानाचे महत्त्व लक्षात घेवून विद्या प्रसारक मंडळाच्या तंत्रनिकेतनने रौप्य महोत्सवी वर्षात

'नॅतो तंत्रज्ञानाची सद्यस्थिती' या ज्वलंत विषयावर राष्ट्रीय परिषदेचे आयोजन ५ जानेवारी २००८ रोजी केले. ही परिषद आयोजित करण्यामागचा मुख्य उद्देश असा की, जगात घडणाऱ्या Nano Technology ची सद्यस्थितीची जनतेमध्ये जागरुकता निर्माण व्हवी.

ही परिषद वि.प्र.मंडळाचे, तंत्रनिकेतनचे प्राचार्य डी. के. नायक यांनी भरवली व परिषदेचे संघटन सचिव म्हणून प्रा. सौ. उषा राघवन (मुख्य विभाग प्रमुख, I F Dept वि.प्र. मंडळाचे, तंत्रनिकेतन, ठाणे) यांनी काम पाहिले.

या परिषदेला नामवंत उद्योजक, संशोधन आणि विकास संस्थेचे प्रतिनिधी, विविध शैक्षणिक संस्थाचे शिक्षणतज्ञ व विद्यार्थी उपस्थित होते.



**डावीकडून : प्राचार्य डी. के. नायक, मुख्य उद्घाटक डॉ. अब्राहम मॅथ्यू, वि.प्र.मंडळाचे खजिनदार :- मा.य.गोखले, परिषदेच्या Organiring secretery - प्रा. सौ. उषा राघवन**

परिषदेचे उद्घाटन डॉ. अब्राहम मॅथ्यू (जनरल मॅनेजर, संशोधन आणि विकास ॲटोमोटिव्ह सेक्टर महिंद्रा ॲण्ड महिंद्रा लि.) यांनी केले. त्यांनी वाहन उद्योगात नॅनो टेक्नॉलॉजीचा कशा प्रकारे वापर करू शकतो याविषयी सखोल माहिती दिली. डॉ. मुरली सास्त्री (मुख्य वैज्ञानिक, टाटा केमिकल्स इनोव्हेशन सेंटर) यांनी आपल्या प्रमुख भाषणात विविध क्षेत्रातील योजनांमध्ये नॅनो तंत्रज्ञानाने सामान्य माणसाच्या जीवनात कसा फरक दिसून येतो, या विषयी विवेचन केले. त्यांच्या संस्मरणीय व मंत्रमुग्ध भाषणाचा उपस्थितांना नक्कीच फायदा झाला.

डॉ. बी. एल. व्ही. प्रसाद (वैज्ञानिक NCL,पुणे) यांनी सुवर्णाचे गुणधर्म नॅनो स्केल मध्ये कशा प्रकारे विशिष्ट गुणधर्म दर्शवितात हे समजून सांगितले.

सन्माननीय प्रा. व्ही. एस. भाकरे यांनी Corrosion आणि नॅनो तंत्रज्ञान याविषयी माहिती दिली.

डॉ. बसवराज मधुसूदन (वैज्ञानिक सेंटर फॉर सायन्सेस ॲण्ड टेक्नॉलॉजी रिचर्स, दावनगिरे) यांनी शेती आणि खाद्य पदार्थां मध्ये nano च्या गुणधर्माची क्रांती अपेक्षित असल्याचे सांगितले.

डॉ. ए. के. त्यागी (Chief, Solid State Chemistry, Dept. BARC) यांनी प्रयोगशाळेत नॅनो मटेरियल्सची निर्मिती व उपयोग याविषयी माहिती दिली.

या परिषदेदरम्यान पोस्टर्स प्रदर्शन भरविण्यात आले होते. त्यामध्ये १४ पोस्टर्स ठेवण्यात आली होती. नॅनो तंत्रज्ञानाच्या विविध योजनांचा सहभाग असलेली पोस्टर्स होते. त्यात औषध, वैद्यक, धोके इत्यादींचा समावेश होता. NCL च्या टीम ने नॅनो मटेरियल्सची कशा पद्धतीने निर्मिती होते, या विषयीची प्रात्याक्षिके दाखविली.

दुपारी जेवणानंतर परिषदेच्या दुसऱ्या सत्राची सुरुवात झाली. डॉ. एस. रामप्रभू (IIT,चेन्नई) यांनी कार्बन नॅनोट्युब व त्याचा वापर करून उर्जा क्षेत्रात एक नवीन संधी निर्माण झालेली आहे असे सांगितले.

डॉ. एस.के. बिश्वास यांनी मायक्रॉन स्केल व नॅनो

*दहावीत नापास होण्यात नववी पर्यंत पास होण्याचं गूढ दडलेल असतं.*

स्केल याची तुलना सुंदर व सोप्या शब्दात श्रोत्यासमोर मांडली. डॉ. जी. एस. सिंग (वैज्ञानिक, रेमण्ड इंडिया लि.) यांनी कापड उद्योगात नॅनो तंत्रज्ञानाचा वापर व डॉ. अरिदम मुखर्जी (ऑसिस्टंट डायरेक्टर नॅनो टेक्नॉलॉजी सेक्शन IRMA) यांनी रबर उद्योगातील नॅनो तंत्रज्ञानाच्या विविध योजना या विषयावर माहिती उपस्थितांना करून दिली.

या परिषदेला भारतातून २० शहरांतील १८० प्रतिनिधी उपस्थित होते. त्यात उद्योग क्षेत्रातील प्रतिनिधींचाही समावेश होता. परिषदे दरम्यान चार शोधनिबंध सादर झाले.

परिषदेची सांगता निरोप समारंभाच्या भाषणाने झाली. दरम्यान उत्तम पोस्टर जाहीर केले गेले व परिषदेच्या संघटन सचिव प्रा. सौ. उषा राघवन यांनी उपस्थितांचे आभार मानले.

## *हे शब्द असे लिहावेत*

### पूजनीय

संस्कृतातील 'अनीय' हा प्रत्यय लागून विशेषण शब्द तयार होतो. 'अनीय' हा प्रत्ययच मुळात दीर्घ असल्यामुळे यापासून तयार झालेले शब्दही दीर्घ असतात. 'पूजनीय' या शब्दात 'प' ला दुसरा उकार व 'न' ला दुसरी वेलांटी द्यावी.

### व्यक्तीकरण

याचा अर्थ आहे प्रकटीकरण, स्पष्टीकरण. हा शब्द लिहिताना हमखास 'व्यक्तिकरण' असा लिहिला जातो. तसे लिहिणे चुकीचे आहे. या शब्दात 'क्त'ला दुसरी वेलांटीच हवी.

### शिलाई

'आई' हा मराठी प्रत्यय लागून धातुसाधित नाम तयार होते. 'शिलाई' या शब्दातील शेवटचे अक्षर दीर्घ असते. 'शिलाई' या शब्दात 'श' ला पहिली वेलांटी व दीर्घ 'ई' लिहावा.

### शिखा

याचा अर्थ आहे शेंडी, तुरा, कलगी, अग्नीची ज्वाला, पावसाची लहान सर. या शब्दात 'श' ला दुसरी वेलांटी न देता पहिली द्यावी. 'शीखा' असे लिहिणे चुकीचे आहे.

### सडीक

सडणे या धूतूस 'ईक' हा मराठी प्रत्यय लागून 'सडीक' हे विशेषण तयार होते. प्रत्ययच दीर्घ असल्यामुळे विशेषण शब्दातील वेलांटी दीर्घच असते.

### पाळीव

'ईक' जसा मराठी प्रत्यय आहे, तसाच 'ईव' हाही आहे. या प्रत्ययापासूनही मराठी शब्द तयार झाले आहेत. 'पाळीव' हा त्यातीलच एक शब्द. हा शब्दही दीर्घच लिहावा. आणखी काही उदाहरणे रेखीव, आखीव इ.

## अफगाणिस्थानचा गणपती



डॉ. विजय बेडेकर व श्री. विनय सहस्त्रबुध्दे हे अफगाणिस्थानच्या दौऱ्यावर गेलेले असताना डॉ. बेडेकर यांनी 'उर्ध्वरेत गणपती' मंदिराचे टिपलेले छायाचित्र.

वेद व योग ह्या विशेष आध्यत्मिक ज्ञानाला ज्या एका विलक्षण साधनेचा संदर्भ आहे, तो म्हणजे 'उर्ध्वरेत क्रिया' होय.

'ऋषी' ही संज्ञा आपण ज्यांना लावतो त्या जीवात्म्यांना 'उर्ध्वरेत क्रियेमध्ये प्राविण्य व अधिकार प्राप्त झालेला असतो. ह्या क्रियेला अमरस्थान मिळवून देण्याची अभिव्यक्ती, ह्या अफगाणिस्थान मधील मंदिराची आहे असे म्हणावयाला लागेल.

(ऋषी : - 'उर्ध्वरेत' प्रविण - स्पंदपुराण, माहेश्वर
(केदार) खंड-अध्याय २२.
डॉ. धनंजय डोंगरे
मुलुंड)

Posting under the Reg. No. MH/MR/TNC-27/2004-2006


# विद्या प्रसारक मंडळ, ठाणे

# थोरले बाजीराव पेशवे सभागृह

☆ ३०० आसनांची व्यवस्था

☆ आधुनिक दृकश्राव्य यंत्रणा

☆ उपाहाराची व्यवस्था

☆ वहाने उभी करण्यासाठी प्रशस्त जागा

☆ प्रसन्न वातावरण

संपर्क

कार्यवाह,

विद्या प्रसारक मंडळ,

नौपाडा, ठाणे ४०० ६०२.

**दूरध्वनी : २५४२ ६२७०**


हे मासिक प्रकाशक आणि संपादक डॉ. विजय वासुदेव बेडेकर व मुद्रक श्री. विलास सांगुर्डेकर, परफेक्ट प्रिंटस् नुरीबाबा दर्गा रोड, ठाणे-४०० ६०१ या मुद्रणालयामध्ये छापून विद्या प्रसारक मंडळ, जिल्हा ठाणे-४०० ६०२ यांच्याकरिता विद्या प्रसारक मंडळ, डॉ. बेडेकर विद्या मंदिर, विष्णूनगर, ठाणे - ४०० ६०२ इथून प्रकाशित केले.